# सार्वजनिक उपक्रम समिती

( २००७-२००८ )

( अकरावी महाराष्ट्र विधानसभा )

**महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या**

**कामकाजासंबंधात महाराष्ट्र शासनाच्या सन २००३-२००४ व २००४-२००५च्या**

**हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या अहवालातील**

**(वाणिज्यिक)प्रकरण चार मधील परिच्छेद क्रमांक**

**४.३, ४.४ व ४.३ यावरील समितीचा**

# दहावा अहवाल

( दिनांक जुलै, २००७ रोजी विधानसभेस / विधानपरिषदेस सादर केला )

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई.

# सार्वजनिक उपक्रम समिती

( २००७-२००८ )

( अकरावी महाराष्ट्र विधानसभा )

**महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या कामकाजासंबंधात महाराष्ट्र शासनाच्या सन २००३-२००४ व २००४-२००५ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या अहवालातील (वाणिज्यिक)प्रकरण चार मधील परिच्छेद क्रमांक ४.३, ४.४ व ४.३ यावरील समितीचा**

# दहावा अहवाल

# सार्वजनिक उपक्रम समिती
# (२००७-२००८)
# - सदस्यांची यादी -

**समिती प्रमुख**

१) श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स.

**सदस्य**

२) श्री. शशिकांत शिंदे, वि.स.स.
३) श्री. बशिर पटेल, वि.स.स.
४) श्री. संजय चव्हाण, वि.स.स.
५) श्री. रमेशभाई कदम, वि.स.स.
६) श्री. चंद्रशेखर भोसले, वि.स.स.
७) श्री. राजवर्धन कदमबांडे, वि.स.स.
८) श्री. राजेंद्र दर्डा, वि.स.स.
९) श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, वि.स.स.
१०) श्री. प्रद्युम्न मेहता, वि.स.स.
११) श्री. प्रतापराव चिखलीकर, वि.स.स.
१२) श्री. मदन पाटील, वि.स.स.
१३) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.
१४) श्री. दिनकर माने, वि.स.स.
१५) श्री. नामदेवराव पवार, वि.स.स.
१६) श्री. रविंद्र गायकवाड, वि.स.स.
१७) श्री. साहेबराव तट्टे, वि.स.स.
१८) श्री. अरुण पाटील, वि.स.स.
१९) श्री. मदन येरावार, वि.स.स.
२०) श्री. नारायणराव गव्हाणकर, वि.स.स.
२१) श्री. सुरेश देशमुख, वि.प.स.
२२) श्री. विश्वनाथ डायगव्हाणे, वि.प.स.
२३) श्री. सदाशिव पोळ, वि.प.स.
२४) श्री. मधुकर सरपोतदार, वि.प.स.
२५) श्री. श्रीकांत जोशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री. अनंत कळसे, प्रधान सचिव
श्री. उमेश खडकीकर, अतिरिक्त सचिव
श्री. वि. श. जोशी, उप सचिव
श्री. विलास आठवले, अवर सचिव
श्री. डी.एम.गवळी, समिती अधिकारी

# अनुक्रमणिका


| अनुक्रमांक (१) | तपशील (२) | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|
| | **प्रस्तावना** | |
| एक | **महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ** (ले.प.अ. २००३-२००४) | |
| (१) | **"खाजगी संस्थेला अनियमित वित्तीय सहाय्य""** (परिच्छेद क्रमांक ४.३) | |
| (२) | **"सुपरस्टार धमाका उत्पादनामधील अनियमितता"** (परिच्छेद क्रमांक ४.४) | |
| (३) | **"कामाची पूर्तता न करणे निधी इतरत्र वळविल्यामुळे महसूल निर्मिती करणाऱ्या मत्तांचे बांधकाम अपूर्ण राहिले होते "** (ले.प.अ. २००४-२००५ ) (परिच्छेद क्रमांक ४.३ ) | |
| दोन | **बैठकीचे परिशिष्ट** | |

# प्रस्तावना

मी, सार्वजनिक उपक्रम समितीचा समिती प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरुन महाराष्ट्र शासनाच्या सन २००३-२००४ व २००४-२००५ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या अहवालातील (वाणिज्यिक) प्रकरण चार मधील महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या कामकाजासंबंधात परिच्छेद क्रमांक ४.३, ४.४ व ४.३ यावरील समितीचा दहावा अहवाल (अकरावी महाराष्ट्र विधानसभा) सादर करीत आहे.

सांस्कृतिक कार्य विभाग व महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ यांच्याकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनावर व माहितीवर समितीने विचार केला. दिनांक १५ व २२ मे, ६ व १९ जून, २००७ रोजी महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या प्रतिनिधींची व विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली.

श्रीमती संगीता चौरे, महालेखाकार, (वाणिज्यिक लेखा परिक्षा) श्री. यु.बी. पाठक वरीष्ठ लेखाधिकारी (वाणिज्यिक लेखा परिक्षा) यांनी निमंत्रणानुसार समितीच्या बैठकांना उपस्थित राहून समितीला केलेल्या मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांचे आभार मानते. श्रीमती चित्कला झुत्सी, अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग श्री. सुनिल सोनी, प्रधान सचिव, वित्त (सुधारणा) श्री. पी.पी. श्रीवास्तव प्रधान सचिव, गृह विभाग, श्री. अ.व. पारसनीस, अपर महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, श्री. विद्याधर कानडे, प्रधान सचिव, वित्त विभाग, श्री. के. सुब्रमण्यम्, प्रधान सचिव, (विशेष) गृह विभाग, श्री. भूषण गगराणी, सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग, व महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक, (अतिरिक्त कार्यभार), श्री. तरवेज, कक्ष अधिकारी सामान्य प्रशासन विभाग यांनी दिलेल्या संपूर्ण सहकार्याबद्दल समिती त्यांचे सुध्दा आभार मानते.

समितीने ----वार, दिनांक ---- २००७ रोजी झालेल्या बैठकीत या अहवालावर विचार करुन तो काही सुधारणांसह संमत केला.

**नाना पटोले,**
समिती प्रमुख,
सार्वजनिक उपक्रम समिती.

विधान भवन,
मुंबई, ---वार, दिनांक, २००७.

## महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित :-

**एक : "खाजगी संस्थेला अनियमित वित्तीय सहाय्य"**

१.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००३-२००४ च्या (वाणिज्यिक) अहवालातील परिच्छेद क्रमांक ४.३ मध्ये **"खाजगी संस्थेला अनियमित वित्तीय सहाय्य"** यासंबंधात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की,

नावाजलेल्या चित्रपट हस्तींचा समावेश असलेला "हम एक है" (एचईएच) ह्या सांस्कृतिक कार्यक्रमांचे संचालन करण्यासाठी महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित (कंपनी) मॉन्टेज (संस्था) या खाजगी संस्थेबरोबर करार (ऑगस्ट २०००) केला. करारानुसार कंपनीने कलाकार व कार्यक्रम निवडीमध्ये सहाय्य करावयाचे व विविध शासकीय विभागांकडून आवश्यक ती परवानगी मिळवून द्यावयाची होती. या देण्यात येणाऱ्या सहाय्यासाठी कंपनीला रुपये २५ लाखाचा सेवा आकार मिळणार होता.

खाजगी संस्थेला अनियमित वित्तिय सहाय्य हा करार करताना संचालक मंडळाची पूर्वसंमत्ती घेण्यात आली नव्हती. करारामध्ये विहित केल्याप्रमाणे संस्थेने त्यांच्या खर्चाने व त्यांच्या जबाबदारीवर कार्यक्रम संयोजित करावयाचा होता. या कलमाचे उल्लंघन करुन कंपनीने संस्थेला वित्तीय सहाय्य दिले. वापरण्यात आलेल्या पध्दतीनुसार एचईएच-फिल्मसिटी नावाचे एक संयुक्त खाते बँक ऑफ महाराष्ट्र (बीओएम) मध्ये उघडणे (सप्टेंबर २०००) व त्याचे कार्यचालन संस्थेचा मालक व कंपनीचा वित्तीय सल्लागार व मुख्यलेखाधिकारी यांनी केले होते.

कंपनीने बीओएम मधील एचईएच-फिल्मसिटी या खात्यात रु.१.८० कोटींची रक्कम हस्तांतरीत केली. त्यानंतर, संस्थेच्या मालकाने ही रक्कम रोख व धनादेशाद्वारे खात्यामधून काढून घेतली (फेब्रुवारी २००१ ते डिसेंबर २००२) अशारितीने, एका खाजगी संस्थेबरोबर संयुक्त खाते उघडणे हे अत्यंत आक्षेपार्ह होते. त्यामुळे मालकाला संयुक्त खात्यामधून रक्कम काढून घेणे शक्य झाले होते. कंपनीच्या मुदत ठेवी रु.१३.५० कोटीच्या तारणावर संस्थेला रु. ७ कोटीपर्यंतचे कर्ज बीओएमला कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालकाने प्राधिकृत केले. (जानेवारी २००१) या

प्राधिकाराच्या आधारावर संस्थेने रु.६.७२ कोटीचे कर्ज घेतले (जानेवारी-मे २००१) संस्थेने फक्त रु.४.३४ कोटी कर्जाची परतफेड केल्यामुळे बीओएमने वसूलीमधील रु.२.३८ कोटीची कमतरता कंपनीच्या मुदतठेवीचे रोखीकरण करुन (एप्रिल-नोव्हेंबर २००१) भरुन काढली होती. एचईएच कार्यक्रम दूरदर्शनवर प्रसारित करण्याची बाब प्रसार भारतीकडे नेण्यात (फेब्रुवारी २००१) आली. संस्थेने प्रत्येक प्रसारणासाठी रु.८० लाख या दराने कमीत कमी हमीदरानुसार रुपये चार कोटीची बँक हमी देणे आवश्यक असतांना बीओएमने कंपनीच्या त्यावेळी असलेल्या व्यवस्थापकीय संचालकांनी दिलेल्या (मार्च २००१) सूचनांच्या आधारावर कंपनीच्या मुदत ठेवीच्या सुरक्षेवर रुपये चार कोटीची बँक हमी दिली होती. त्यानंतर एचईएचने एप्रिल-मे २००१ मधील कार्यक्रम प्रसारणासाठी प्रसार भारतीला प्रदान करण्यात संस्थेला अपयश आले. प्रसार भारतीने कंपनीने दिलेली रु. चार कोटी रकमेची हमी आवाहित केली. संस्थेने कंपनीला त्यापैकी फक्त रुपये १५ लाख परत (फेब्रुवारी २००१) केले व उर्वरित रुपये ३.८५ कोटीची रक्कम संस्थेकडून वसूल व्हायची राहिली होती. (ऑगस्ट २००४).

अशा रितीने करारामध्ये कंपनीचा कोणताही वित्तीय सहभाग नव्हता असे विहित केलेले असतानाही त्याचे उल्लंघन करुन कंपनीने एका खाजगी संस्थेला रुपये ८.०३ कोटीचे अनियमित वित्तीय सहाय्य दिले. (जानेवारी-फेब्रुवारी २००१) होते.

शासनाने /कंपनीने उत्तरात म्हटले (मे २००४) होते की संबंधित कर्मचाऱ्यांवर व खाजगी संस्थेवर कारवाई सुरु करण्यात आली होती.

१.२ या प्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमूद केले की, महामंडळाने मे. मोंटाजचे मालक श्री. शाहब अहमद यांच्याशी "हम एक है" कार्यक्रम आयोजित करण्यासाठी दिनांक १४/८/२००० रोजी संचालक मंडळाची पूर्वसंमत्ती न घेता करारनामा केला होता, ही वस्तुस्थिती आहे. कारण विषय क्रमांक ७३/९ च्या अनुषंगाने दि.२९/८/२००० रोजी झालेल्या ७३ व्या संचालक मंडळाच्या बैठकीत "हम एक है" हा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजन करण्यासाठी टिप्पणी सादर केल्याचे दिसते. त्या बैठकीत खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आलेला आहे.

"हम एक है या कार्यक्रमासाठी महामंडळावर कोणताही आर्थिक भार येत नसल्याने कोआर्डिनेटर म्हणून काम करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. "

तसेच विषय क्रमांक ७५/१३ च्या संदर्भातील संचालक मंडळाच्या दिनांक १४/९/२००१ च्या ७५ व्या बैठकीच्या विषयसूची व इतिवृत्तावरुन असे दिसून येते की, तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक यांनी मे. मोंटाज या संस्थेबरोबर "हम एक है" कार्यक्रमासाठी महामंडळाने करार केला असल्याबाबतचे व महामंडळास समन्वयक म्हणून करण्यासाठी रु.२५ लक्ष मिळणार असल्याचे संचालक मंडळास निदर्शनास आणले होते. त्याबाबत संचालक मंडळाच्या बैठकीचे इतिवृत्त खालीलप्रमाणे आहे."

"संचालक मंडळाने याबाबतची नोंद घेतली."

आक्षेपात नमूद केलेली माहिती योग्य आढळून येते. संचालक मंडळाच्या ७३/९ या ठरावान्वये महामंडळाने कोणताही आर्थिक भार न घेता केवळ समन्वयक म्हणून काम करण्यास मंजूरी दिली होती. तसेच विषय क्र.७५/१३ अन्वये समन्वयक म्हणून काम करण्यासाठी महामंडळाला रु.२५ लक्ष मिळणार आहेत असे तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक मंडळाचे निदर्शनास आणले होते. त्याबाबत "संचालक मंडळाने नोंद घेतली." असा ठराव पारित झाल्याचे दिसून येते. त्यानंतर दिनांक २ सप्टेंबर, २००० रोजी बँक ऑफ महाराष्ट्र, ओशिवरा शाखा येथे खाते क्र.१४२ हे हम एक है-फिल्मसिटी या नावाने संयुक्त खाते उघडण्यात आले. सदर खाते श्री. साहब अहमद व श्री. अ.ग. शुक्ल यांचे संयुक्त नावाने उघडण्यात आले होते. सदर कार्यवाही संचालक मंडळाचे ठरावाचे अनुषंगाने चुकीची होती, कारण संचालक मंडळाने "हम एक है" कार्यक्रमासाठी महामंडळाने कोणत्याही आर्थिक सहभागाशिवाय फक्त समन्वयक म्हणून काम पहावे अशी मान्यता प्रदान केली होती. या विषयी संबंधित बँकेनेही संयुक्त खाते उघडण्यासाठी संचालक मंडळाचे ठराव किंवा प्राधिकरची मागणी केली नाही ही बाब आश्यर्चकारक वाटते. तसेच "हम एक है" कार्यक्रमाचे तपशिलवार लेखे तपासणी अंती असे स्पष्ट होते की, सुरुवातीला बँक ऑफ महाराष्ट्रामध्ये हम एक है-फिल्मसिटी खाते उघडण्यासाठी रु.१००/- ही रक्कम महामंडळाचे निधी मधून वापरण्यात आली आहे. तसेच त्यानंतर पुढीलप्रमाणे रकमा

महामंडळाचे निधीमधून हम एक है-फिल्मसिटी या खात्यामध्ये हस्तांतरित झाल्याचे उपलब्ध लेख्यावरुन स्पष्ट होत आहे.

| **अ. क्र.** | **दिनांक** | **म.चि.र.सा.वि.मं.चे खाते क्र.२१७ (रक्कम नावे)** | **दिनांक** | **हम एक है फिल्मसिटी खाते (खाते क्र.१४२) रक्कम जमा** |
|---|---|---|---|---|
| १. | २०/०२/२००१ | i) रु. २०,००,०००/-<br>ii) रु. १०,००,०००/- | २०/०२/२००१ | i) रु. २०,००,०००/-<br>ii) रु. १०,००,०००/- |
| २. | १५/१०/२००१ | i) रु. १०,००,०००/- | १५/१०/२००१ | i) रु. १०,००,०००/- |
| ३. | ०७/१०/२००२ | i) रु. २०,२०,०६५/- | ०७/१०/२००२ | i) रु. २०,२०,०६५/- |
| ४. | १४/१०/२००२ | i) रु. १०,००,०००/-<br>खाते क्र.५१३० (SBI) | १४/१०/२००२ | i) रु. १०,००,०००/- |
| | एकूण | रु. ७०,२०,०६५/- | एकूण | रु. ७०,२०,०६५/- |

वरील तपशीलावरुन असे निश्चित होते की, महामंडळाचे निधीमधून रु.७०,२०,०६५/- इतकी रक्कम "हम एक है" या कार्यक्रमासाठी वापरण्यात आली होती. सदर बाब झालेल्या कराराशी विसंगत होती.

"हम एक है" कार्यक्रम आयोजित करण्यासाठी मे. मोंटाजचे मालक श्री. शाहब अहमद व महामंडळाचे तत्कालीन वित्तीय सल्लागार आणि मुख्यलेखाधिकारी श्री. अ.ग. शुक्ल यांच्या संयुक्त स्वाक्षरीने बँक ऑफ महाराष्ट्र, ओशिवरा शाखा येथे एचईएच फिल्मसिटी नावाचे नवीन संयुक्त खाते उघडण्यात आले होते ही बाब सत्य आहे. सदर खाते हे दोन्ही व्यक्तींनी वैयक्तीक नावाने उघडले होते असे उपलब्ध अभिलेख्यावरुन दिसते. सदर बाब प्रचलित वित्तीय नियम व मार्गदर्शक सूचनांचे विरुध्द असल्याचे आढळून येते. श्री. अ.ग. शुक्ल, तत्कालीन वित्तीय सल्लागार आणि मुख्यलेखाधिकारी यांना त्यांनी केलेल्या नियमबाह्य कृतीबद्दल महामंडळाचे सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे.

महामंडळाने बँक ऑफ महाराष्ट्र मधील खात्यामधून हम एक है-फिल्मसिटी खात्यास रु.१.८० कोटीची रक्कम हस्तांतरित केली, ही बाब सत्य नाही. महामंडळाने एकूण रु. ७०,२०,०६५/- इतकी रक्कम हम एक है-फिल्मसिटी या खात्यामध्ये हस्तांतरित केली हे वरील परिच्छेदाचे उत्तरात नमूद केलेले आहे. तसेच बँक ऑफ

महाराष्ट्र मधील हम एक है-फिल्मसिटीचे खात्याचे बँक विवरणपत्रावरुन स्पष्ट होते की, खाजगी संस्थेचे मालक श्री. साहब अहमद, ज्यांचेसोबत संयुक्त खाते उघडण्यास आले होते, त्यांनी व तत्कालीन वित्तीय सल्लागार व मुख्यलेखाधिकारी श्री. अ.ग. शुक्ल यांनी संयुक्तरित्या विविध दिनांकास ( दि.२७/०९/२००० ते २२/१०/२००२) स्वत:चे नावे रु.१,२४,३०,०००/- इतकी रोख रक्कम आहरित केली होती. ही रक्कम धनादेशाद्वारे आहरित केलेल्या रकमेव्यतिरिक्त असल्याचे संबंधित बँकेच्या विवरणपत्रावरुन स्पष्ट होते.

आक्षेपात नमूद केलेली माहिती योग्य असल्याचे उपलब्ध अभिलेख्यांवरुन दिसून येते. उपलब्ध लेख्यावरुन असे स्पष्ट होते की, महामंडळाचे तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक मंडळाचे मान्यतेशिवाय, बँक ऑफ महाराष्ट्र, ओशिवरा शाखेचे व्यवस्थापक यांना दिनांक २२ जानेवारी, २००१ चे पत्रान्वये कळविले होते की, श्री. अ.ग. शुक्ल, तत्कालीन वित्तीय सल्लागार आणि मुख्यलेखाधिकारी यांना हम एक है कार्यक्रमासाठी आवश्यक असलेले रु.६.०० कोटीपर्यंतचे कर्ज उपलब्ध करुन घेणेसाठी प्राधिकृत करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने तत्कालीन वित्तीय सल्लागार व मुख्यलेखाधिकारी यांनी बँक ऑफ महाराष्ट्रला महामंडळाचे मुदत ठेवीच्या सुरक्षेवर कर्ज उपलब्ध करुन देणेबाबत विनंती केली होती. तसेच महामंडळाने नेमलेल्या विशेष लेखा परिक्षक यांचे लेखा परिक्षण अहवालावरुन असे दिसून येते की, महामंडळाचे ठेवीच्या सुरक्षेवर बँक ऑफ महाराष्ट्रने "हम एक है" कार्यक्रमासाठी एकूण रु. ६,७२,२५,८८२/- इतकी रक्कम कर्ज रुपाने उपलब्ध करुन दिली होती. सदर रक्कम व त्यावरील व्याज मिळून एकूण रु.७,०५,५४,४६५/- इतकी रक्कम परतफेड होणे बाकी होती असेही सदर अहवालात नमूद केले आहे. लेखा परिक्षण अहवालात पुढे असेही नमूद करण्यात आले आहे की, संबंधित खाजगी संस्थेने वरील थकीत कर्जापैकी रु.४,३९,०४,७७६/- इतक्या रकमेची परतफेड केली होती व थकीत रक्कम रु.२,६६,४९,६८९/- परतफेड करणे बाकी होती. सदर थकीत कर्जाची रक्कम बँक ऑफ महाराष्ट्रने महामंडळाचे मुदत ठेवी रोखीकृत करुन वसूल केली होती. याबाबत महामंडळाने दि.१०/०४/२००३ रोजी पोलिस विभागाचे आर्थिक गुन्हे शाखा

यांचेकडे श्री. गोविंद स्वरुप, श्री. अ.ग. शुक्ल, श्री. तापीकर, तत्कालीन बँक व्यवस्थापक, बँक ऑफ महाराष्ट्र, ओशिवरा शाखा व श्री. शाहब अहमद यांचेविरुध्द तक्रार नोदविण्यात आली आहे. तसेच सचिव, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र शासन यांनाही महामंडळाने श्री. गोविंद स्वरुप, तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक यांचेविरुध्द योग्य ती कारवाई करणेबाबत मुख्य सचिव यांचेकडे शिफारस करणेस्तव प्राधिकृत केले आहे. तसेच बँक ऑफ महाराष्ट्र ओशिवरा शाखा यांचेविरुध्द महामंडळाने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दिनांक २८/०४/२००५ रोजी रु.९,४०,८६,८५९/- इतकी रक्कम वसूल होणेस्तव दिवाणी दावा दाखल केला आहे. सदर दाव्यामध्ये श्री. शाहब अहमद, श्री. गोविंद स्वरुप, तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक व श्री. अ.ग. शुक्ल तत्कालीन वित्तीय सल्लागार आणि मुख्यलेखाधिकारी यांनाही प्रतिवादी करण्यात आले आहे.

आक्षेपात नमूद केलेली माहिती सत्य आहे. महामंडळाचे तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक यांनी त्यांचे दिनांक ३१/०३/२००१ चे पत्रान्वये "हम एक है" कार्यक्रम दूरदर्शनवर प्रसारित करण्यासाठी प्रसार भारतीला रु.४.०० कोटीची बँक हमी देणेसाठी बँक ऑफ महाराष्ट्रला प्राधिकृत केले होते. सदर कार्यक्रम जो दि.२६/०१/२००१ रोजी प्रसारित होणार होता त्याऐवजी दिनांक १३/०४/२००१ रोजी प्रसारित करावयाचा असलेने वरीप्रमाणे पत्र दिले असल्याचे दिसून येते. तद्नंतर संबंधित खाजगी संस्थेने प्रसारभारतीला द्यावयाची बँक हमी पैकी फक्त रु.१५.०० लाखाची रक्कम अदा केल्यामुळे, प्रसार भारतीने महामंडळाने दिलेली रु.३.८५ कोटीची बँक हमी आवाहित केली. बँक ऑफ महाराष्ट्रने महामंडळाचे मुदत ठेवीच्या बाबत केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने दि.२८/०४/२००५ रोजी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रु.९,४०,८६,८५९/- इतकी रक्कम वसूल होणेस्तव दिवाणी दावा दाखल केला आहे. सदर दाव्यामध्ये श्री. साहब अहमद, श्री. गोविंद स्वरुप, तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक व श्री. अ.ग. शुक्ल तत्कालीन वित्तीय सल्लागार आणि मुख्यलेखाधिकारी यांनाही प्रतिवादी करण्यात आले आहे.

सदर दाव्यामध्ये "हम एक है" कार्यक्रमासाठी वरील परिच्छेदात नमूद केलेली कर्जाची रक्कम रु.२,६६,४९,६८९/- व रु. ३,८५,००,०००/- प्रसारभारतीने आवाहित केलेली रक्कम अशी एकूण रु. ६,५१,४९,६८९/- ही रक्कम वरील दाव्यामध्ये मूळ वसूलपात्र मुद्दल (व्याज वगळून) म्हणून नमूद केली आहे.

१.३ महामंडळाच्या वरील अभिप्रायाशी शासनाने खालीलप्रमाणे मत व्यक्त केले आहे.

१.४ महामंडळामध्ये आढळून आलेल्या अनियमिततेच्या संदर्भात महामंडळाने केलेल्या कार्यवाही शिवाय शासनपातळीवर तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक, श्री. गोविंद स्वरुप यांचेविरुध्द विभागीय चौकशी आदेशित करण्यात आली. त्या चौकशीचा अहवाल प्राप्त झालेला असून शासनस्तरावर अहवालाचे परिक्षण करण्यात येत आहे. त्याशिवाय सदर प्रकरण लाचलुचपत प्रतिबंध अधिकाऱ्याकडे सोपविण्यात आले असून त्यांनी तपास पूर्ण करुन अंतिम अहवाल सादर केलेला आहे. लाचलुचपत अधिकाऱ्यांकडून प्राप्त झालेल्या अहवालाची छाननी वरिष्ठ कायदेशीर सल्लागार यांचेमार्फत करण्यात येत आहे.

१.४ या प्रकरणी समितीने महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक कार्य विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक आणि पर्यटन व सांस्कृतिक विभागाचे सचिव यांची दिनांक १५ व २२ मे, ६ व १९ जून २००७ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी, व्यवस्थापकीय संचालकांनी या संदर्भात अशी माहिती दिली की, "हम एक है" कार्यक्रम महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक कार्य विकास महामंडळाने खाजगी कंपनीबरोबर एक करार केला होता. सदर करारानुसार "हम एक है" या नावाने देशातील ५ मुख्य शहरात हा कार्यक्रम होणार होता. या कार्यक्रमाचे भाग तयार करण्यात येऊन त्यांचे हक्क वेगवेगळया टी.व्ही. चॅनल्सना विकायचे होते. सदर करारास महामंडळाच्या संचालक मंडळाची मान्यता नव्हती. सदर करार दिनांक १४ ऑगस्ट, २००० रोजी करण्यात आला आणि त्यानंतर संचालक मंडळासमोर दिनांक २९.८.२००० रोजी मान्यतेसाठी ठेवण्यात आला. संचालक मंडळाने त्यावेळी अशी भूमिका घेतली होती की, "हम एक है" या कार्यक्रमामुळे चित्रपट रंगभूमी महामंडळावर कुठलाही आर्थिक स्वरुपाचा भार येत नसल्याने या संपूर्ण कार्यक्रमाचे समन्वय

करण्यास हरकत नाही. याचाच अर्थ असा की, खाजगी कंपनीने सदर कार्यक्रम तयार करावयाचा आणि त्याचे समन्वयन फिल्मसिटीने करावयाचे व त्यासाठी फिल्म सिटीला २५ लक्ष रु. मिळतील असाही करारात समावेश होता. सदर करारानंतर फिल्मसिटीने २ सप्टेंबर, २००० रोजी त्यांचे मूळ खाते असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्र या बँकेत "हम एक है" या नावाने श्री. अ.ग. शुक्ल या महामंडळाच्या लेखधिकाऱ्याने व खाजगी संस्थेचे मालक श्री. शाहब अहमद यांचे बरोबर संयुक्त खाते क्रमांक १४२ उघडले. सदर खाते हे तत्कालीन मुख्य लेखाधिकारी श्री.शुक्ल यांच्या स्वाक्षरीने उघडण्यात आले. "हम एक है" या कार्यक्रमाची सादरकर्ती व्यक्ती श्री. शाहब अहमद ही असून सदर व्यक्तीबरोबरच हे खाते उघडण्यात आले. त्यावेळी तत्कालीन संचालक मंडळ यांची या कार्यक्रमास मान्यता होती असे दिसून येते. पण संचालक मंडळाची या कराराला मान्यता नव्हती कारण बँकेत दुसरे खाते संचालक मंडळाचा खाजगी व्यक्तीच्या नावाने अशा प्रकारे उघडण्यासाठी कधीच मान्यता देणे शक्य नव्हते. पुढे त्यांनी असेही सांगितले की, श्री. शाहब अहमद आणि श्री. शुक्ल हे दोन नविन उघडलेल्या खात्याचे मुख्य सिगनेटरी होते. त्याच बँकेत फिल्म सिटीचे ओरिजनल अकाऊंटसुध्दा होते आणि या फिल्मसिटीच्या ओरिजनल खात्यामधून नवीन उघडण्यात आलेल्या खात्यामध्ये फिल्मसिटीचे पैसे वर्ग करण्यात आले. सन २००२ मध्ये जवळपास एक वर्षानंतर हा प्रकार संचालक मंडळाच्या लक्षात आला आणि त्यानंतर संचालक मंडळाने या प्रकरणी एक चौकशी समिती नेमून सदर समितीने आपला अहवाल संचालक मंडळाला सादर केला या कार्यक्रमाच्या तयारीसाठी सुरुवातीला फिल्मसिटीचे एकंदर ७०.२० लाख रुपये खाजगी खात्यात वर्ग करण्यात आले व असे पैसे वर्ग करण्याचे काहीच कारण दिले नाही व त्या संदर्भात कुठल्याही प्रकारचा दस्तावेज देखील उपलब्ध नाही. चौकशी समितीने या प्रकरणाची जी चौकशी केली त्या चौकशी अहवालात काय म्हटले आहे अशी विचारणा केली असता, त्यावर सांगण्यात आले की, तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक श्री. गोविंद स्वरुप आणि तत्कालीन लेखा अधिकारी श्री.शुक्ल यांचेविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यात येऊन श्री.शुक्ल यांना महामंडळाच्या सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे. तर श्री. गोविंद

स्वरुप यांच्या चौकशीसाठी माजी निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र राज्य श्री. डी.एन. चौधरी यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करुन त्यांच्यामार्फत या प्रकरणाची चौकशी केली. सदर चौकशी अधिकाऱ्याने श्री. गोविंद स्वरुप यांच्यावरील आरोप सिध्द होत नसल्याने त्यांची निर्दोष मुक्तता केली. निवडणूक आयुक्त म्हणून काम केलेल्या व्यक्तीने भ्रष्टाचार झाला नाही असा अहवाल देणे ही अतिशय गंभीर बाब आहे असे मत समितीने व्यक्त केले. परंतु सदर चौकशी अहवालास शासनाने असहमती दर्शवून श्री. गोविंद स्वरुप यांच्या निवृत्ती वेतनामधून दोन तृतीयांश रक्कम कपात करण्यात यावी अशी शिफारस करुन सदर प्रकरण केंद्र शासनाकडे पाठविले. सदर प्रकरणात ७०.२० लाख रुपयांची अफरातफर करण्यात आली असून या संदर्भात श्री. गोंविंद स्वरुप यांच्याविरुध्द फौजदारी गुन्हा नोंदवून लाचलुचपत प्रतिबंधक खात्यामार्फतदेखील चौकशी करण्यात आली. सदर गुन्हयामध्ये श्री. गोविंद स्वरुप यांची न्यायालयाने जामिनावर मुक्तता केली आहे. **तसेच त्यांच्या मालमत्तेचे जप्तीचे निर्णय ही बाब सुध्दा लाचलुचपत प्रतिबंधक खात्याच्या अखत्यारीत आहे.** सदर रकमेच्या अपहाराच्या वेळी श्री. गोविंद स्वरुप हे चित्रपट नगरीचे व्यवस्थापकीय संचालक त्याचप्रमाणे सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिवदेखील होते व त्यांच्याकडे ही दोन्ही पदे एकाच वेळी होती. मार्च २००२ ते सप्टेंबर २००२ या कालावधीतील आणखी अफरातफरीची प्रकरणे संचालक मंडळाच्यासमोर गेली असून संचालक मंडळाने या संदर्भात वेगवेगळया कंपन्यांबरोबर सर्व करार रद्द करण्यात यावेत असा ठराव केला.

**या प्रकरणाची पूर्णपणे चौकशी करुन कारवाई करण्याचे निदेश मुख्य सचिवांना संचालक मंडळाने दिले.** श्री. गोविंद स्वरुप हे विभागाचे सचिव त्याचप्रमाणे महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक ही दोन्ही पदे एकाच वेळी सांभाळत होते. त्यांनी खाजगी कंपनीबरोबर करार करुन नियमबाहयपणे महामंडळाची रक्कम वापरुन पैशांचा गैरव्यवहार केला. गैरव्यवहार केलेली रक्कम वसूल करण्यासंदर्भात चौकशी समितीने कोणताही निष्कर्ष काढला नाही. त्याचप्रमाणे शासनाने श्री. गोविंद स्वरुप यांच्या निवृत्तीवेतनातून रक्कम कपात करण्याची शिफारस करुन प्रकरण केंद्र सरकारकडे पाठविले. अपहारीत रक्कम व निवृत्तीवेतनातून कपात करण्यात यावयाची रक्कम

यांच्यामध्ये मोठी तफावत दिसते. याबाबत समितीला विभागाकडून कोणत्याही प्रकारचे समाधानकारक उत्तर मिळाले नाही. रु. २५ लक्ष ऐवजी कंपनीने रु. १.८० कोटी इतकी रक्कम संयुक्त खात्यामध्ये हस्तांतरीत करण्याचे कारण काय अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी असे सांगितले की, "हम एक है" या कार्यक्रमाचे खाते क्रमांक १४२ हे आहे. तर फिल्मसिटीचा खाते क्रमांक २१७ हा आहे. फिल्मसिटीच्या खात्यामधून "हम एक है" या खाजगी कार्यक्रमाच्या खात्यात संचालक मंडळाची मान्यता नसताना पैसे वर्ग करण्यात आले आहेत. सदर पैसे वर्ग करताना महामंडळाची परवानगी आहे किंवा नाही याची खातरजमा न करता बँकेने पैसे वर्ग केले आहेत. फिल्मसिटीत स्टुडीओंची संख्या कमी असल्याने ते बांधण्यासाठी शासनाच्या गॅरंटीने महामंडळाने २० कोटी रुपये कर्ज रोख्याद्वारे उभारावयाचे होते. यापैकी रक्कम रु. ६.३९ कोटी ही "हम एक है" या कार्यक्रमासाठी वापरण्यात आली.

सदर प्रकरणाची चौकशी लाच लुचपत प्रतिबंधक विभागामार्फत होत असल्याने समितीस या प्रकरणासंदर्भात अधिक माहिती घेण्याच्या दृष्टीने या संदर्भात श्री. डी. पी. श्रीवास्तव, प्रधान सचिव, गृह विभाग (विशेष) यांची दिनांक २२ मे २००७ रोजी साक्ष घेतली. सदर साक्षीच्या वेळेला विभागीय सचिवांनी समितीस असे विदित केले की, या प्रकरणाची सुरुवात सन १९९९ मध्ये झाली असून सदर प्रकरणाची चौकशी करण्यासाठी शासनाने चौकशी समिती नियुक्त केली होती. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी मार्च २००४ मध्ये लाच लुचपत प्रतिबंधक विभागाला तात्काळ आदेश देण्यात आले होते. त्यानुसार लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने दिनांक ३१ जुलै, २००४ रोजी श्री.गोविंद स्वरुप, विभागाचे सचिव तथा महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक, व श्री. अ. ग. शुक्ल, तत्कालीन मुख्य लेखाअधिकारी आणि श्रीमती आर विमला या तिघांवर चार्जशिट दाखल करण्याचे प्रस्तावित केले. शासकीय कर्मचारी असल्यामुळे यांच्यावर शासनाकडून परवानगी घेतल्यानंतरच गुन्हा दाखल करण्यात येतो. त्यानुसार श्री. गोविंद स्वरुप आणि श्री.शुक्ल यांच्यावर आरोपपत्र दाखल करण्यास संबंधित विभागाने परवानगी दिली. मात्र श्री. आर विमला यांच्यावर आरोपपत्र दाखल करण्यास त्यांच्या महसूल व वन विभागाने परवानगी न दिल्याने

त्यांच्यावर आरोपपत्र दाखल करण्यात आले नव्हते. या प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून गृह विभागाकडे डिसेंबर,२००५ मध्ये प्रकरण आले होते. **यातील दोषी व्यक्तींवर आरोपपत्र दाखल करण्यासाठी ८ मार्च, २००६ रोजी परवानगी मिळण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाकडे प्रकरण पाठविले होते. परंतु परवानगीसाठी फारच विलंब लागलेला आहे.** यावेळी श्री. अजित पारसनीस, अप्पर महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांनी समितीस अशी माहिती दिली की, "हम एक है" या कार्यक्रमामध्ये श्री. शाहब अहमद यांना ६ कोटी रुपयांचा तोटा झाला होता परंतु तो तोटा महामंडळाने स्वत:च्या डोक्यावर घेतला व तशा प्रकारचा ठपका लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने महामंडळावर ठेवला आहे. समितीने यावेळी अशीही विचारणा केली की, **सदर गैरव्यवहाराच्या प्रकरणात उपरोक्त नमूद केलेले तिनही अधिकारी गुंतले असल्याचा आरोप लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केल्यानंतर या तिनही अधिकाऱ्यांच्या मालमत्तेची जप्ती करण्याच्या संदर्भात का कार्यवाही केली नाही. या संदर्भात श्री. पारसनीस, अप्पर महासंचालक यांनी असे सांगितले की, सदर तिनही अधिकाऱ्यांच्या मालमत्तेची जप्ती करण्याबाबतचा निर्णय शासनालाच घ्यावयाचा आहे.** समितीने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला अशी विचारणा केली की, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने या प्रकरणी गैरव्यवहार झाल्याचे कबूल केले असल्याने सदर विभागाने या प्रकरणी नेमके कोणते काम केले ? आरोप पत्र किती तारखेला दाखल केले तसेच त्यात कोणते आरोप केले आहेत याची समितीला माहिती देण्याबाबत सांगितले. त्यानुसार समितीला अशी माहिती देण्यात आली की, भारतीय दंड विधानाच्या कलम ४०९, ४२०, १२० (ब), १३, १३(क), १३(ड), १३(२) अन्वये गुन्हा नोंदविला आहे. तत्कालीन व्यवस्थापकीय संचालकांनी संचालकमंडळापासून बऱ्याच गोष्टी लपवून व अज्ञात ठेवल्या होत्या. यामध्ये त्यांनी महामंडळाची परवानगी घ्यावयास पाहिजे होती. त्यांनी ती घेतली नसल्याने सर्व व्यवहारामध्ये त्यांनी मनमानीपणे महामंडळाची परवानगी नसताना इकडचे पैसे तिकडे फिरवले, उदा. इंटर ड्रिंक्स कंपनी बरोबर दिनांक ३१ डिसेंबर, २००५ रोजी "सुपर धमाका" या कार्यक्रमासाठी करार केला होता. त्यामध्ये २५ लक्ष रुपयांची बँक गॅरंटी देण्यात आली

होती. इंटर ड्रिंक्स कंपनी महामंडळास ३१ लक्ष, २० हजार रुपये परत देणार होती. परंतु त्यापैकी १२ लक्ष ५० हजार रुपयेच त्यांनी महामंडळास परत केले यामध्ये महामंडळाच्या मुदत ठेवी मोडल्यामुळे १२ लक्ष ५० हजार रुपयांचा तोटा महामंडळास सहन करावा लागला. त्यानंतर १३ भागांच्या मालिकेसाठी मेसर्स गारमेंट पेपर मिल्स यांच्यासोबत करार करण्यात आला. एकंदरच मिळालेली रक्कम "हम एक है" च्या बँक खात्यात जमा करण्यात आली होती. परंतु खाजगी संस्थेची मालिका सुरु झाली नाही त्यामुळे दीड कोटी रुपयांचा आर्थिक तोटा महामंडळावर आला. **सदर करार महामंडळाच्या बैठकीमध्ये आला असता, संचालक मंडळाने या प्रस्तावास परवानगी नाकारली व असे प्रस्तावित केले की, सदर प्रस्ताव मा. मुख्यमंत्र्यांसमोर मान्यतेसाठी ठेवण्यात यावा. सदर प्रस्ताव मा. मुख्यमंत्र्यांच्या मान्यतेसाठी प्रलंबित असतानाही व्यवस्थापकीय संचालकांनी सुधारित प्रस्ताव आपल्या अखत्यारीत मान्य करुन अतिरिक्त रक्कम १.२० कोटी व १.९५ कोटी मान्य करुन घेतली.** अशा प्रस्तावास मा.मुख्यमंत्र्यांची परवानगी घ्यावी लागते. परंतु असे न करता व्यवस्थापकीय संचालकांनी बेकायदेशीर व्यवहार चालू ठेवल्यामुळे सदरचे पैसे कंपनीला देऊन त्यामुळे महामंडळास तोटा सहन करावा लागला. समितीने अशी विचारणा केली की, या महामंडळामध्ये पैशाची अफरातफर झाल्याची बाब शासनाच्या लक्षात आल्यानंतरच शासनाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे हे प्रकरण दिले. शासनाने चौकशी साठी जे प्रकरण लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे पाठविले त्या मागचा शासनाचा उद्देश काय होता अशी विचारणा केली असता, या संदर्भात समितीला काहीही उत्तर देण्यात आले नाही. **मात्र दुसऱ्या एका प्रश्नाच्या उत्तरात सांगण्यात आले की, अफरातफर झालेल्या रकमेची वसूली करण्याची तरतूद या कायद्यात नाही.**

सदर प्रकरणात पैशाची अफरातफर झाल्याची प्रथमदर्शनी माहिती पुढे आल्यानंतर शासनाने प्रथम पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदविण्याची भूमिका का घेतली नाही ? सदर प्रकरण सुरुवातीलाच लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे चौकशीसाठी पाठविण्याची गरज का भासली नाही ? श्री. डी.एन. चौधरी यांच्या चौकशी समितीचा अहवाल शासनाने का नाकारला ? राज्य शासनाच्या अखत्यारितील सर्व महामंडळावर

वित्त विभागाचे सर्व प्रकारच्या मोठ्या बाबींच्या आर्थिक विनीयोजनावर तसेच खर्चावर देखरेख अथवा नियंत्रण असते मग या प्रकरणात वित्त विभागाने कोणत्याही प्रकारची देखरेख का केली नाही ? वित्त विभागाच्या, सदर प्रकरण अपहाराचे असल्याचे निदर्शनास केंव्हा आले ? सामान्य प्रशासन विभागाकडे हे प्रकरण केंव्हा पाठविले ? श्री. गोविंद स्वरुप यांचे विरुध्द प्रथमदर्शनी शासनाच्या पैशाचा अपहार झाल्याचे निदर्शनास येऊनही त्यांची मालमत्त जप्त करण्याबाबत कायद्यात अस्तित्वात असलेली कार्यवाही का केली नाही, इत्यादी बाबींची माहिती समितीला विभागीय सचिवांकडून अपेक्षित असताना देखील ती माहिती मिळाली नाही. श्री. गोविंद स्वरुप यांच्याविरुध्द कार्यवाही करण्यासंदर्भात सामान्य प्रशासन विभागाकडे पत्रान्वये कळविल्यानंतर सामान्य प्रशासन विभागाने नेमकी कोणती कार्यवाही केली व या संदर्भातील नस्ती समितीला दाखविण्यात यावी असे समितीने मागणी केली असता, तसेच सदर प्रकरणाची चौकशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे सोपविण्यासंदर्भात कोणत्या विभागाने शिफारस केली अशी समितीने विचारणा केली असता, अप्पर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांनी समितीस फक्त एवढेच सांगितले की, त्यावेळी विभागाची नेमकी कोणती विचारधारा होती याचे मूळ आता माहीत नाही. सदर प्रकरणात पैशाचा अपहार झाला ही बाब उघड होऊनही आरोपींवर गुन्हा दाखल करण्यास व शासनाकडून परवानगी घेण्यास विलंब कां झाला यावर देखील समितीस कोणत्याही प्रकारचे उत्तर देण्यात आले नाही. श्री. गोविंद स्वरुप यांची मालमत्ता जप्त करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली तसेच त्यांच्याकडे किती मालमत्ता आहे अशी समितीने विचारणा केली असता, श्री. गोविंद स्वरुप यांच्या मालमत्तेची चौकशी करण्यात आली नसून ती अपहाराची केस असल्यामुळे मालमत्तेची झडती घेतली असती तर जास्त मालमत्ता सापडल्यास त्या बाबतची वेगळी प्रक्रिया आहे, परंतु तसे करण्यात आले नाही. तसेच समितीला असेही सांगण्यात आले की, नियमाप्रमाणे प्रत्येक अधिकारी आपल्या मालमत्तेचे रिटर्न फाईल करुन ती माहिती सरकारला कळवितो. त्यामुळे तेवढीच माहिती आमच्याकडे असते व असे रिटर्न श्री. गोविंद स्वरुप यांनी शासनाला सादर केले असून ते बंद लिफाफ्यामध्ये सादर केले आहेत. मात्र तो बंद

लिफाफा सामान्य प्रशासन विभागाचे प्रधान सचिव म्हणून मी उघडलेला नाही व मालमत्तेची शहानिशा केलेली नाही. तसेच यासाठी लागणारी परवानगी मुख्य सचिवांकडून घ्यावी लागत असल्याने ती देखील घेतली नाही.

या प्रकरणी प्रधान सचिव, (सुधारणा), वित्त विभाग यांची दिनांक ६ जून २००७ रोजी समितीने साक्ष घेतली. सदर साक्षीच्या वेळेस समितीने शासनाच्या कोणत्याही आर्थिक व्यवहारामध्ये वित्त विभागाची भूमिका महत्वाची असून शासन स्तरावर वेळोवेळी महामंडळा संदर्भातील धोरण निश्चित करण्यात येते व त्या अनुषंगाने विविध आदेश पारीत करण्यात येतात. महामंडळाच्या आर्थिक बाबींची तपासणी शासनामार्फत करण्यात येते काय? तसेच शासनाचे महामंडळाच्या आर्थिक बाबींवर नियंत्रण नसते काय ? अशी विचारणा केली असता, समितीस असे सांगण्यात आले की, कोणत्याही शासकीय उपक्रमांना त्यांच्या मागणीनुसार कर्जरोखे अथवा शेअर्स उपलब्ध करुन देण्यापुरता वित्त विभागाचा सहभाग असतो. त्यानंतर सर्व कामे त्या त्या विभागाची असतात. महामंडळाच्या संबंधित संचालक मंडळ व व्यवस्थापकीय संचालक यांनी निर्णय घ्यावयाचा असतो. यावरील नियंत्रण हे त्या त्या विभागाचे असते. वित्त विभागाची देखरेख केवळ अर्थसंकल्पात तरतूद झाल्यानंतर ती रक्कम संबंधित विभागाला वितरीत करण्यापुरती मर्यादित असते. वित्त विभागावर सामान्यता समन्वयकाची व सनियंत्रणाची जबाबदारी नसते. मात्र आवश्यक तेथे संबंधित विभागाने वित्त विभागांचा सल्ला त्या त्या विभागाकडून घ्यावयाचा असतो. या ठिकाणी व्यवस्थापकीय संचालक व विभागीय सचिव ही एकच व्यक्ती असल्याने त्या व्यक्तीने पदाचा पुरेपूर उपभोग व उपयोग करुन घेतला असल्याचे दिसून येते. तसेच महामंडळाला जर संयुक्त खाते उघडावयाचे असेल किंवा गुंतवणूक करावयाची असेल तर संचालक मंडळात तसा ठराव करुन त्या ठरावा संबंधात विभागाची मान्यता घेतली पाहिजे. रुल्स ऑफ बिझनेसमधील कलम १४ (अ) मध्ये असे नमूद केले आहे की, राज्य सरकारच्या सार्वजनिक उपक्रमाचे समन्वयन व पर्यवेक्षण करण्यासाठी सुकानू समिती स्थापन करुन वित्त विभागाने समन्वय करावे व पर्यवेक्षणासाठी सुकानू समिती स्थापन करावी अशी त्यांची भूमिका आहे. संबंधित विभागाकडून शेअर्स किंवा

कर्जरोख्यांचा प्रश्न असेल आणि तशा प्रकारचा प्रस्ताव संबंधित विभागाकडून वित्त विभागाकडे आला तर हा निधी कशासाठी हवा आहे वगैरे बाबतची माहिती वित्त विभागाकडून घेता येते. त्याचप्रमाणे भांडवली खर्चाला मंजुरी देणे अशा सर्व प्रकारची कामे वित्त विभागाकडून केली जातात व सामान्यता अशा प्रकारची पध्दती पाळली जात असून ती वित्त विभागास बंधणकारक नाही. त्याचप्रमाणे कॅपिटल बजेटमध्ये होणारे खर्च वित्त विभागाकडून तपासले जात असून रेव्हेन्यू बजेटमधील खर्च वित्त विभागाकडून तपासले जात नाहीत. म्हणून महाराष्ट्र चित्रपट रंगभूमि आणि सांस्कृतिक विकास महामंडळाकडून केल्या जाणाऱ्या खर्चाची माहिती वित्त विभागाकडे नसते. सांस्कृतिक कार्य विभागाने महामंडळाची मंजुरी व शासनाची गॅरंटी घेऊन निधी मिळविल्यानंतर तो संबंधीत विभागाने योग्यरित्या वापरला नाही. तसेच ज्या वेळी सांस्कृतिक कार्य विभागाकडे निधी देण्यासंदर्भात प्रस्ताव देण्यात आला त्यावेळी त्यांना कॅपिटल बजेटींग करण्यास वित्त विभागाने का भाग पाडले नाही ? तसेच बॉन्डद्वारे पैसे देण्यास मंजुरी का देण्यात आली ? याबाबत वित्त्त विभागाचे नियंत्रण आहे किंवा कसे ? इत्यादीबाबत समितीने माहिती विचारली असता, **प्रस्तावित प्रकरणातील बाब वित्त विभागाच्या लक्षात आली असती तर या संदर्भात निश्चितच कार्यवाही केली गेली असती परंतु ही बाब वित्त विभागाच्या लक्षात आली नाही असे समितीस सांगण्यात आले.**

तसेच या विषयी बजेटमध्ये कोणती माहिती देण्यात आली होती याबाबत अधिक तपास करुन माहिती देता येईल असे समितीस सांगण्यात आले. मात्र अद्यापही समितीस याबाबतची माहिती वित्त विभागाकडून मिळाली नाही.

**"दिनांक १२ नोव्हेंबर २००२ रोजी संचालक मंडळाच्या समोर हे सर्व गैरव्यवहाराचे प्रकरण उघडकीस आले होते** व त्यानंतर संचालक मंडळाने याबाबत गुन्हा दाखल केला. श्री. संगितराव , तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक यांनी सदर प्रकरण उघडकीस आल्यानंतर आर्थिक गैरव्यवहार म्हणून आर्थिक गुन्हे शाखेकडे उक्त प्रकरण चौकशी करिता पाठविले. चौकशी अंती सदर प्रकरण लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे पाठविण्यात आले **व तशा प्रकारचे पत्र मुख्य सचिवांकडे पाठविण्यात आले" असे समितीस सांगण्यात आले.** मुख्य सचिव यांच्याकडे पाठविण्यात आलेल्या पत्रातील

मजकूर समितीस वाचून दाखविण्यात यावा अशी मागणी केली असता, समितीस असे सांगण्यात आले की, आर्थिक गुन्हे शाखेनेही आर्थिक बाबी संदर्भात कार्यवाही असल्याच्या कारणाने व पैशाची अफरातफर असल्या कारणाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे अंतिम चौकशी करण्यात यावी असे सदर पत्रात म्हटले आहे. त्यावर समितीने **जून २००३ ते मार्च २००४ अशा एकंदर नऊ महिन्यांच्या कालावधीमध्ये या प्रकरणावर कार्यवाही का करण्यात आली नाही त्याची कारणे काय आहेत अशी विचारणा केली असता, सदर नऊ महिन्यांचा कालावधी चौकशी करता जास्त असल्याची बाब गृह विभागाच्या सचिवांनी समितीसमोर कबूल केली. मुख्य सचिवांनी सदर पत्रावर नऊ महिने कार्यवाही का केली नाही याबाबत समितीला काहीही माहिती देण्यात आली नाही. तेंव्हा समितीने पुढील बैठकीत मुख्य सचिवांची साक्ष घेण्याचे ठरविले.**

दिनांक १९ जून २००७ रोजी समितीने ठरविल्याप्रमाणे मुख्य सचिव यांना समितीसमोर साक्षीसाठी बोलाविले असता मुख्य सचिव समितीसमोर साक्षीला आले नाहीत. मात्र साक्षीच्या दिवशी सायंकाळी ४.१५ वा. "काही अपरिहार्य कारणास्तव ते दिल्लीला जात असल्याने साक्षीसाठी ते उपस्थित राहू शकत नाही" असे पत्राद्वारे कळविले.

श्री. गोविंद स्वरुप यांनी केलेल्या अपहाराचे स्वरुप लक्षात घेता त्यांची मालमत्ता जप्त का करण्यात आली नाही तसेच त्यांना न्यायालयाकडून जामीन का मिळाला या प्रकरणाशी कोणकोणत्या विभागाचा संबंध येतो त्यासर्व विभागाच्या सचिवांना समितीसमोर समितीने अधिक माहितीसाठी दिनांक १९ जून २००७ रोजी साक्षीसाठी बोलावले. उक्त रोजी सामान्य प्रशासन विभागाच्या सचिवांनी, "श्री. गोविंद स्वरुप यांनी त्यांच्या मालमत्तेच्या संदर्भातील पाठविलेला लिफाफा बघण्याची मला परवानगी नसून सदर लिफाफा उघडावयाचा असेल तर त्यासाठी योग्य ती कार्यवाही करावी लागते व योग्य ते कारण देऊन मुख्य सचिवांची परवानगी घ्यावी लागते." यानुसार याची प्रक्रिया अशी आहे की, शासकीय कर्मचाऱ्याचा उदरनिर्वाह त्याच्या स्वत:च्या आर्थिक स्त्रोतावरुन ओळखून त्यांने किती मालमत्ता धारण केली याची

माहिती शासनाला द्यावी यामागील उद्देश असा आहे की, भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांच्या मालमत्तेची माहिती सामान्य प्रशासन विभागाकडे असते. एखाद्या व्यक्तीची याबाबत तक्रार आली असल्यास, अशा अधिकाऱ्याचा लिफाफा उघडून पाहिला जातो. किंवा लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सदर अधिकाऱ्यासंदर्भात मालमत्ता जाणून घेण्याची मागणी केल्यास सदर विभागास शासनाची मान्यता घेऊन मालमत्तेसंदर्भातील लिफाफा उघडण्यात येतो व त्यांना माहिती पुरविली जाते.

श्री. गोविंद स्वरुप यांनी शासनाच्या पैशांचा अपहार केला असे प्रथमदर्शनी लक्षात आल्यानंतर शासनाची परवानगी घेऊन त्यांच्यावर फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल केला व शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने चौकशी अधिकाऱ्यांचा अहवाल धुडकावून लावून त्यांच्या निवृत्ती वेतनातून दोन तृतियांश वेतन कपात करण्यासंबंधीची शिफारस करुन सदर प्रकरण केंद्र सरकारकडे पाठविले, असे असूनदेखील श्री. गोविंद स्वरुप यांच्या मालमत्तेचे लिफाफे का उघडले नाहीत अशी समितीने विचारणा केली असता, सामान्य प्रशासन विभागाचे अप्पर मुख्य सचिव, श्रीमती चित्कला झुत्सी यांनी याबाबत समितीस वरीलप्रमाणे असे उत्तर दिले. **दुसऱ्या एका प्रश्नाच्या उत्तरात त्यांनी अशीही माहिती दिली, "I would like to submit humbly that there is no provision under the rules or laws to attach the property of the person at the begining of any inquiry."**

लाचलुचपत प्रतिबंधक अधिकारी (तपास अधिकारी) यांची दिनांक २७ जून, २००७ रोजी या प्रकरणातील पोलीस तपास अधिकारी यांची समितीने साक्ष घेतली. सदर साक्षीच्या वेळी, महामंडळाचे तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक, श्री. गोविंद स्वरुप यांचे प्रकरण आपल्या हातात कोणत्या वर्षी आले गुन्हा दाखल झाल्यानंतर आपण तपास ताबडतोब का सुरु केला नाही. गुन्ह्यातील आरोपींना तातडीने अटक करण्यासाठी कोणत्या अडचणी होत्या इ. माहिती समितीने विचारली असता, समितीस असे विषद करण्यात आले की, दिनांक २१ जुलै, २००४ रोजी वरिष्ठांच्या आदेशाने तपास अधिकारी म्हणून गुन्हा कमांक ४५/०४ भा.दं.वि. कलम ४०९/४२०, १२० (ब), आणि लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ अन्वये कलम १३ (१) (क), १३ (१) (ड)

सह १३ (२) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी गुन्हेगारांच्या मालमत्तेच्या सदर प्रकरणासंबंधी नस्तींसाठी झडत घेतल्या. या गुन्ह्यामधील कुठलेही मुळ कागदपत्रे नव्हती कारण आर्थिक गुन्हे शाखेने या प्रकरणासंबंधातील सर्व कागदपत्रांच्या झेरॉक्स मागून घेतल्या होत्या. आणि त्यांच्याकडे त्या कागदपत्राची एक झेरॉक्स प्रत होती त्यातून असे दिसून आले की, या बाबतीत शासनाने एका शासन निर्णयाद्वारे एक चौकशी समिती नेमली होती. कागदपत्रे मिळण्यासंदर्भात आम्ही श्री. गोविंदस्वरुप, व श्री. अ.ग. शुक्ल यांच्य घरावर छापा टाकून झडती घेतली असता, त्यांच्याकडे कुठलीही कागदपत्रे आढळून आली नव्हती. असे एकंदर आम्ही ८ ठिकाणी छापे टाकले होते. **श्री. शाहाब अहमद यांच्याकडे छापा टाकला असता, त्यांच्याकडे या प्रकरणाची मुळ कागदपत्रे व चित्रपट रंगभूमीचा मूळ करारनामा आढळून आला व तो जमा केला व त्या आधारे आम्ही या प्रकरणाचा तपास सुरु केला तपासामध्ये आजपर्यंत १२९ साक्षीदारांच्या जबान्या घेतल्या** तसेच हा तपास अखिल भारतीय स्तरावर सुरु होता. मुंबई, दिल्ली, कलकत्ता, हैद्राबाद व बेंगलोर या शहरांचा त्यात समावेश होता. या शहरात जाऊन आम्ही पेपर जमा केले आयकर विभागाकडून आम्हाला काही पेपर मिळाले अशा प्रकारे तीन कपाटे कागदपत्रे जमा झाली. या सर्व कागदपत्रांची बारकाईने तपासणी केली. त्यानंतर प्रत्येक आरोपीच्या विरोधात पुरावे गोळा करुन त्या संदर्भात आरोपीचे काय म्हणणे आहे हे जाणून घेण्यासाठी श्री. गोविंद स्वरुप यांना साक्ष देण्यासाठी बोलावले. त्यांना वेगवेगळे प्रश्न विचारुन त्यांची जबानी घेतली. त्यानंतर जे जे प्रश्न विचारण्यात आले होते त्यासाठी त्यांनी प्रत्येक वेळी वेळ मागून घेतली होती. अशाप्रकारे आक्टोबर २००४ चे फेब्रुवारी २००५ पर्यंत प्रश्नोत्तरे चालली होती ही संपूर्ण चौकशी केल्यानंतर तपासाचा अंतिम अहवाल दिनांक ७ जून, २००५ रोजी वरिष्ठांकडे सादर केला. दिनांक २१ जुलै, २००४ रोजी या प्रकरणात गुन्हा दाखल केल्यानंतर तात्काळ अटक करणे शक्य नव्हते कारण माझ्याकडे पुरावा दाखल कुठलेही पुरेशी व मुळ कागदपत्रे नव्हती फक्त आर्थिक गुन्हे शाखेचा अहवाल होता. उपलब्ध असलेल्या कागदपत्राच्या प्रथम माहिती अहवाल (एफ. आय. आर.) दाखल केला. यामध्ये दखलपात्र गुन्हा घडलेला आहे व या प्रकरणाचा तपास करणे

आवश्यक आहे म्हणून देखील माझ्याकडे पुरेसे पुरावे नसल्यामुळे व मला या संपूर्ण प्रकरणाची काहीही माहिती नसल्यामुळे मी गुन्हेगाराला अटक करु शकलो नाही. कारण अटक केल्यानंतर मला विचारण्यात आले असते की, मी कोणत्या पुराव्यामध्ये त्यांना अटक केली आहे व त्यांच्या या प्रश्नाला मला निरुत्तर व्हावे लागले असते. हे पुरावे मला गोळा करण्यासाठी सहा महिने कालावधी लागला व विलंब होण्याचे खरे हेच कारण आहे. या प्रकरणाची अजुनही बारकाईने तपासणी चालू आहे.

समितीने तपास अधिकारी यांना असे विचारणा केली की, आपण अतिरिक्त पोलिस महासंचालकाकडे तपास अहवाल सादर केल्यानंतर त्यांनी आरोपींना किती दिवसात अटक करण्यासंबंधी सूचनादेणे आवश्यक होते. तसे आपण आपला तपास किती महिन्यात पूर्ण केला आणि या स्थितीला आपणाकडे या प्रकरणाची मूळ कागदपत्रे आहेत का अशी माहिती समितीला सांगण्यात आली. माझी १५ ऑक्टोबर २००५ राजी बंदली झाल्यानंतर ह्या प्रकरणाचा कार्यभार श्री. मढवी, पोलीस निरीक्षक यांच्याकडे देण्यात आला. त्यांनी **डिसेंबर, २००४ मध्ये असा निर्णय घेतला की, या प्रकरणात भरपूर पुरावे असल्यामुळे हे प्रकरण शासनाच्या मान्यतेसाठी पाठविले. सदर प्रकरणाचा तपास ११ महिन्यात पूर्ण केला आहे सध्या या प्रकरणाची संपूर्ण मुळ कागदपत्रे उपलब्ध आहेत. शाहब अहमद यांच्याकडे ८ कराररनाने मिळाले असून त्यात १५.५ कोटीचा गैरव्यवहार दिसून येतो.**

समितीने तपास पूर्ण झाल्यानंतर श्री. मढवी, तपास अधिकारी यांनी आरोपींना किती दिवसात अटक केली अशी विचारणा केली असता शासनाकडूनमान्यता मिळाल्यानंतर अटकेबाबत वरीष्ठांची परवानगी घेऊन आरोपीच्या घरी गेले असता ते गायब झाल्याचे समजले. नंतर न्यायालयाकडून अटक वॉरंट काढून आरोपींना अटक करण्यात आली.

समितीने अशीही विचारणा केली की, तपास यंत्रणेने शासनाकडे चौकशी अहवाल दिल्यानंतर त्याला मान्यता मिळण्यासाठी १३ महिन्याचा कालावधी लागतो काय ? हे प्रकरण संबंधीत विभागाकडे केंव्हा पाठविण्यात आले व किती दिवस प्रलंबीत होते ? त्याप्रमाणे पोलीस तपासात आरोपींने फक्त १२.५ कोटींचा गैरव्यवहार

केला असा निष्कर्ष असून बाकीच्यारकमेची चौकशी का केली नाही या समिती सदस्यांच्या प्रश्नाला कोणतेही उत्तर देण्यात आले नाही.

**१.५ अभिप्राय व शिफारशी :-**

या प्रकरणी समितीला मिळालेली लेखी व तोंडी माहिती विचारात घेता असे दिसून येते की, "हम एक है" या कार्यक्रमाचा करार फिल्म सिटीने एका खाजगी कंपनी सोबत केला होता. त्यासाठी फिल्म सिटीचे करारापुर्वीचे खाते क्र. २१७ व करारानंतर खाजगी कंपनीचे खाते क्र.१४२ हे एचईएच-फिल्पसिटी या नावाने हे बँक ऑफ महाराष्ट्र या बँकेत उघडण्यात आले होते. हे खाते श्री. शाहब अहमद व अ.ग. शुक्ल यांचे नावे संयुक्त खाते म्हणून उघडण्यात आले होते. फिल्मसिटीच्या खाते क्रमांक २१७ या खात्यामधून संचालक मंडळाची परवानगी न घेता खाजगी व्यक्तींच्या खात्यावर रु. १.८० कोटींची रक्कम या अपहारात समावेश असलेल्या श्री. गोविंद स्वरुप, श्री. अ.ग. शुक्ल, श्रीमती आर. विमला, शाहब अहमद व बँकेच्या संबंधीत अधिकाऱ्यांनी वर्ग केली. फिल्मसिटीचे पैसे अवैद्यरित्या व मान्यतेशिवाय वर्ग करुन तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक श्री. गोविंद स्वरुप यांनी मनमानीपणे महामंडळाच्या पैशांचा स्वतःच्या व खाजगी संस्थेच्या फायद्यासाठी गैरवापर केला आहे. तसेच संस्थेच्या मालकाने सदर रक्कम रोख व धनादेशाद्वारे कुणाच्याही मान्यतेशिवाय अवैधरित्या तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक श्री. गोविंद स्वरुप, श्री. अ.ग. शुक्ल इ. लोकांच्या संगनमताने एच.ई.एच.फिल्मसिटी या खात्यामधून काढून घेतली. अशारितीने एका खाजगी संस्थेबरोबर संचालक मंडळाची मान्यता न घेता संयुक्त खाते उघडून तत्कालीन व्यवस्थापकीय संचालकांनी नियमबाहय कृत्य केले.

"हम एक है" हा कार्यक्रम दूरदर्शनवर प्रसारीत करण्याची बाब प्रसार भारतीकडे फेब्रुवारी २००१ मध्ये नेण्यात आली. खाजगी संस्थेने प्रत्येक प्रसारणासाठी रु. ८० लक्ष या दराने कमीत कमी हमी दरानुसार रु. ४ कोटींची बँक हमी देणे आवश्यक असताना बँक ऑफ महाराष्ट्रने, कंपनीच्या त्यावेळी असलेल्या व्यवस्थापकीय संचालकांनी दिलेल्या सूचनांच्या आधारावर कंपनीच्या मुदत ठेवींच्या सुरक्षेवर रु. ४ कोटींची संचालक मंडळाची मान्यता न घेता गैरप्रकारे हमी दिली. मात्र "हम एक है" या कार्यक्रमाचे

प्रसारण करण्यास खाजगी संस्थेला अपयश आले. प्रसार भारतीने महामंडळाने दिलेली रु. ४ कोटी रकमेची हमी आवाहित केली. या रकमेपैकी खाजगी संस्थेने महामंडळास फक्त १५ लाख रुपये फेब्रुवारी २००१ मध्ये परत दिले व उर्वरित रक्कम ३.८५ कोटी संस्थेकडून २००४ पर्यंत वसूल झाली नाही. "हम एक है" कार्यक्रम आयोजित करण्यासाठी मेसर्स मोन्टाजचे मालक श्री. शाहब अहमद व महामंडळाचे अर्थ सल्लागार व मुख्य लेखाअधिकारी श्री. अ.ग. शुक्ल यांच्या स्वाक्षरीने संयुक्त खाते उघडण्यात आले. सदर खाते हे दोन्ही व्यक्तीने वैयक्तिक नावाने उघडले होते जे प्रचलित वित्तीय नियम व मार्गदर्शक सूचनांचे विरोधी आहे. श्री. अ. ग. शुक्ल, तत्कालीन वित्तीय सल्लागार आणि लेखाअधिकारी हे महामंडळाच्या सेवेत असल्यामूळे त्यांनी केलेल्या नियमबाहय कृत्याबद्दल महामंडळाने त्यांना सेवेतून बडतर्फ केले. मात्र श्री.गोविंद स्वरुप, तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक हे गैरव्यवहार करण्यास प्रामुख्याने जबाबदार आहेत. ते भारतीय प्रशासकीय सेवेतील असल्यामुळे त्यांच्यावर कार्यवाही करण्यात आली नाही. त्यांनी पध्दतशीरपणे, जाणीवपूर्वक अधिकाराचे उल्लंघन करुन महामंडळाला व संचालक मंडळाला अंधारात ठेवून, महामंडळाची दिशाभूल करुन, खाजगी कंपनीसोबत संधान बांधूनशासनाच्या पैशांचा अवैधरित्या वैयक्तिक स्वार्थासाठी वापर करुन मोठया प्रमाणावर गैरव्यवहार केला. असे असूनदेखील शासनाच्या संबंधित विभागांनी या संदर्भात भारतीय संविधानात नमूद केलेल्या तरतुदींनुसार व प्राप्त परिस्थितीत उपलब्ध असलेल्या कायेदशीर तरतुदीच्या आधारावर चौकशी व कार्यवाही केली नसून, जी चौकशी केली ती समितीच्या मते थातूर मातूर व भारतीय प्रशासकीयसेवेतील अधिकाऱ्याला पध्दतशीर, जाणीवपूर्वक व हेतुपुरस्सरपणे एकंदरच सर्व प्रकरणांमधून श्री. स्वरुप हे या व्यवहारातून न्यायालयातून व इतर चौकशी समित्यांमधून निर्दोष सुटावेत यासाठीच प्रयत्न केलेले दिसून येतात. कारण श्री. अ. ग. शुक्ल हे महामंडळाच्या सेवेत असल्यामुळेच त्यांना प्रकरण उघडकीस आल्याबरोबर तात्काळ बडतर्फ (Dismissed) करण्यात आले. मात्र गोविंद स्वरुप यांच्याबाबत संबंधीत विभागानी तत्परता दाखविली नाही याचे समितीस केवळ आश्चर्यच वाटत नसून भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांची लॉब असून ते त्यांच्या सेवेतील सहकाऱ्यांना कसे वाचविता येईल हेच पाहतात असे एकंदरीत सर्वच

विभागीय सचिवांच्या साक्षीवरुन समितीस दिसून आले. एकंदरच हे प्रकरण प्रलंबित ठेवण्याच्या दृष्टीने या प्रकरणासंबंधीत चौकशीत अधिकाऱ्यांनी व विभागप्रमुखांनी जाणीवपूर्वक अस्तित्वात असलेला पुरावा बेदखल करुन तो समितीसमोर येऊ दिला नाही. कारण सदर चौकशी समितीसमोर शासनाची बाजू मांडण्याकरिता चौकशी समितीसमोर उप सचिव दर्जाच्या अधिकाऱ्याने बाजू मांडून शासनाची भूमिका स्पष्ट केली. तेथे त्यावेळी तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक व सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव या दोन्ही पदावर कार्यरत श्री. गोविंद स्वरुप होते. शासनाच्या विभागात शासकीय सेवेतील कनिष्ठ व वरिष्ठ अधिकारी यांचे संबंध पाहता, उप सचिव दर्जाचे अधिकारी भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांच्या विरोधातील बाजू समर्थपणे कशी मांडू शकतील हे समितीला एक कोडेच वाटते. म्हणून समिती या चौकशी समितीच्या अभिप्रायाबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करते. **या प्रकरणी समिती अशी शिफारस करते की, ज्या अधिकाऱ्यांची चौकशी करावयाची आहे त्याविरुध्द बाजू मांडण्यासाठी त्याच दर्जाच्या समतुल्य अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात यावी आणि अशी चौकशी तीन महिन्याच्या आत झाली पाहिजे यासाठी सध्याच्या प्रचलित नियमात दुरुस्ती करण्यात यावी.**

समितीला असे सांगण्यात आले की, श्री. डी.एन.चौधरी यांची चौकशी समितीच्या अभिप्रायासंदर्भात शासन असहमत असून शासनाने श्री. गोविंद स्वरुप यांची निवृत्ती वेतनातून दोन तृतियांश रक्कम कपात करण्याची शिक्षा ही श्री. गोविंद स्वरुप यांना केली आहे व तशी बाब केंद्र शासनाकडे मान्यतेसाठी पाठविली आहे. याबाबत समितीला सखेद आश्चर्य वाटते. कारण प्रकरण उघडकीस आले त्यावेळेस दोन्ही पदांवर श्री. गोविंद स्वरुप हे कार्यरत होते. तेव्हा त्यांच्याविरुध्द यथोचित कार्यवाही न करता ते शासनाच्या सेवेतून निवृत्त झाल्यानंतर त्यांच्या विरुध्द कार्यवाही सुरु करण्यात आली. त्यामुळे या प्रकरणातील जे संबंधीत अधिकारी निर्णयाप्रत पोहचले त्यांची भुमिका समितीस संशयास्पद वाटते. कारण श्री. गोविंद स्वरुप यांच्या विरुध्द करण्यात येणाऱ्या कार्यवाहीची नस्ती तत्कालीन मुख्य सचिव यांचेकडे सुमारे नऊ महिने कोणत्याही निर्णयाशिवाय प्रलंबीत पडून होती. सदर नस्तीवर तात्काळ यथोचित व कायदेशीर कार्यवाही करण्यासंदर्भात कोणत्याही विभागाने पुन्हा मुख्य सचिवांसोबत पत्रव्यवहार

केला किंवा कसे ही बाब समितीच्या समोर येऊ शकली नाही व तसे सांगण्याचा प्रयत्नदेखील कोणी केला नाही, याचेही समितीस सखेद आश्चर्य वाटते. **म्हणून समिती अशी शिफारस करते की, श्री. गोविंद स्वरुप यांच्या विरुध्द करावयाच्या कार्यवाहीची नस्ती तत्कालीन मुख्य सचिवांकडे नऊ महिने कां पडून राहिली, त्यांनी त्यावरकारवाई करण्यात एवढा विलंब का लावला याची चौकशी करण्यात यावी व त्याचा अहवाल समितीला तीन महिन्यात सादर करण्यात यावा.**

सर्वसामान्य कर्मचाऱ्याने किंवा अधिकाऱ्याने शासनाच्या पैशांचा अपहार अथवा गैरव्यवहार केल्यास त्याला श्री. अ.ग. शुक्ल यांच्याप्रमाणे बडतर्फ करण्यात येते. मात्र भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांच्या विरोधात गुन्हा नोंदविण्यास विलंब तर लावला जातोच शिवाय अशा अधिकाऱ्यांच्या विरोधात फौजदारी कारवाई करण्यासंदर्भात संबंधित विभागाचे सचिव हे प्रकरण लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे पाठवावे की आर्थिक गुन्हा शाखेकडे पाठवावे या बाबतचा निर्णय घेवू शकले नाही हे ही समितीला एक कोडेच वाटते. **वास्तविक श्री. गोविंद स्वरुप यांनी अफरातफर केलेली सर्व रक्कम वसुल करता येईल अशा पध्दतीने गुन्हा दाखल करावयास पाहिजे होता. तथापि, अजूनही त्या गुन्ह्याच्या कालमामध्ये सुधारणा करुन तसे कलम समाविष्ट करावे व अपहाराची सर्व रक्कम श्री. गोविंदस्वरुप यांच्याकडून वसूल करावी अशी समितीची शिफारस आहे.**

समितीने सामान्य प्रशासन विभागाच्या सचिवांची देखील साक्ष घेतली. भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्याकडे किती संपत्ती आहे याचे विवरण तो दर वर्षी आर्थिक वर्ष संपण्यापूर्वी बंद लिफाफ्यामध्ये शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडे पाठवित असतो. श्री. गोविंद स्वरुप यांच्याविरुध्द फौजदारी स्वरुपातील गुन्हा व तोही पैशांच्या अपहारासंदर्भातील असूनदेखील सामान्य प्रशासन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवांनी तो लिफाफा अद्याप उघडला नाही. त्याचप्रमाणे बंद लिफाफा उघडण्या संदर्भातील प्रचलित नियमानुसार मुख्य सचिवांची परवानगी घेतली नाही व गोविंद स्वरुप यांच्याकडे वैध, अवैध मालमत्ता किती आहे हे ही संबंधीत तपास यंत्रणेस व चौकशी करणाऱ्या यंत्रणेस याबाबत चौकशी करावी वाटली नाही, ही बाब अतिशय गंभीर आहे असे

समितीला वाटते. **श्री. गोविंद स्वरुप व त्यांच्या नातेवाईकांच्या संपत्तीची चौकशी करुन त्यावर टाच आणून रक्कम वसूल करण्यासाठी पावले उचलावीत अशी आग्रहाची शिफारस आहे.**

श्री. गोविंद स्वरुप यांनी केलेल्या गुन्हयाच्या स्वरुपावरुन असे निदर्शनास येते की, त्यांनी कोटयवधी रुपयांच्या पैशांचा अपहार केला आहे असे असूनदेखील गृह विभागाने नमूद केल्यानुसार, त्यांना न्यायालयातून २५ लक्ष रुपयांच्या वैयक्तिक जात मुचलक्यावर जामीन मिळाला आहे. एकूणच याबाबतही समिती संभ्रमित असून अशा पैशांचा अपहार करणाऱ्या व्यक्तींवर शासनाने कठोर व सर्वांगीण चौकशी न करता थातूर मातूर कारवाई केली असल्याचे समितीला संबंधीतांच्या साक्षीवरुन व उपलब्ध असलेल्या लेखी पुराव्यावरुन वाटत असल्याने याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करते. **समिती अशी शिफारस करते की, भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांनी आपल्या संपत्तीबाबत दिलेली बंद लिफाफ्यातील विवरणपत्रे दरवर्षी उघडून पाहण्यात यावीत व काही संशयास्पद वाटल्यास त्वरीत चौकशी करण्यात यावी. यासाठी मुख्य सचिवांच्या परवानगीची अट काढून टाकण्यात यावी व यासाठी प्रचलीत नियमात दुरुस्ती करण्यात यावी.**

**उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता समितीची अशी शिफारस आहे की, "हम एक है" या कार्यक्रमासंदर्भात पैशांच्या एकूण किती रुपयांचा अपहार करण्यात आला याची फेर चौकशी करण्यात यावी. या संदर्भात अपहार निदर्शनास आला असल्यास, त्या संदर्भातील सुधारित आरोप पत्र न्यायालयास न्यायालयाच्या पुर्व संमतीने प्राप्त परिस्थितीत उपलब्ध असलेल्या कायद्याच्या आधारे निष्पक्ष चौकशी करुन याबाबत केलेल्या कार्यवाहीसहित सादर करण्यात यावे. तसेच श्री.गोविंद स्वरुप यांच्या निवृत्ती वेतनातील शासनाने प्रस्तावित केलेली दोन तृतियांश रकमेची कपात रद्द करुन त्यांच्या संपूर्ण वैध/ अवैध मालमत्तेची चौकशी करुन ती जप्त करुन अपहार केलेल्या रकमेची वसूली करण्यात यावी. तसेच एखाद्या भारतीय प्रशासकीय अधिकाऱ्यावर अथवा कुठल्याही वर्ग १, वर्ग २ च्या अधिकाऱ्यांवर प्रथमदर्शनी अपहाराचा आरोप सिध्द होत असल्यास, शासनाने अशा व्यक्ती विरोधी गुन्हा नोंदविण्यास विलंब न करता तात्काळ परवानगी द्यावी. कारण अशा व्यक्तीचे**

**सर्वसंबंधीत विभागात लागेबांधे असण्याची शक्यता गृहीत धरुन ते त्यांच्याविरुध्द उपलब्ध पुराव्यांत फेरफार करु शकतात. "जम्मू आणि काश्मिर" राज्य शासनाने यासंबंधात ज्या कर्मचारी / अधिकाऱ्यांकडे त्यांच्या वैध संपत्तीपेक्षा अधिक संपत्ती सापडेल ती सरकार जमा करण्याचा कायदा केलेला आहे. तसाच कायदा आपल्या राज्यातही करण्यात यावा अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

श्री. गोविद स्वरुप हे ज्यावेळी त्यांच्याविरोधी प्रथम दर्शनी अपहार कल्याचा ठपका ठेवण्यात आला व त्यांच्या विरोधी फौजदारी कारवाई प्रस्तावित केली त्याबाबतची नस्ती शासनाच्या समोर नऊ महिने पडून होती ही बाबदेखील समितीला अनाकलनीय वाटत आहे वित्त विभागाच्या सचिवांच्या साक्षीत नमुद असल्याप्रमाणे श्री. गोविंद स्वरुप हे सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव व महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळ यावर व्यवस्थापकीय संचालक अशी दोन्ही पदे एकाच वेळी भूषवित असल्यामुळे त्यांनी जे जे निर्णय घेतले ते स्वतःच्या अखत्यारित मनमानीपणे, अवैधरित्या व महामंडळास अंधारात ठेवून घेतले व त्यामुळे ते महामंडळाच्या पैशाचा मोठ्या प्रमाणावर अपहार करीत राहीले. त्यांच्यावर त्यांच्या विभागातील कुणाही वरिष्ठ अधिकाऱ्याचे नियंत्रण नसल्यामुळे ते महामंडळाचा कारभार मनमानीपणे करित राहिले. **एवढेच नव्हे त्यांच्या गैरकारभाराची प्रकरणे मुख्य सचिव व मा. मुख्यमंत्री यांच्यापर्यंत पोहचूनही त्यांचा गैरकारभार सुरुच राहिला होता. त्यामुळे या वरिष्ठांचा त्यांना पाठिंबा व प्रोत्साहन होते काय याबाबत समिती शासंक आहे. त्यामुळे समितीची अशी शिफारस आहे की, विभागीय सचिव व महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक या दोन्ही पदावर एकाच वेळी एका व्यक्तीची नियुक्ती अथवा पदोन्नती करण्यात येऊ नये अन्यथा अशा प्रकरणांची पुनरावृत्ती व्हायला वेळ लागणार नाही.**

समितीने चित्रपट महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक यांचे व्यतिरिक्त या प्रकरणांशी जे जे कोणी विभागीय सचिव संबंधीत असतील किंवा त्यांच्याकडे कुठल्याना कुठल्या प्रकारची नस्ती निर्णयासाठी जात असेल अशा सर्व विभागीय सचिवांची जसे, सामान्य प्रशासन विभाग, वित्त विभाग, गृह विभाग, सांस्कृतिक कार्य विभाग व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, आर्थिक गुन्हे अन्वेषण

विभाग इत्यादी सचिवांची व अधिकाऱ्यांची साक्ष घेतली. समितीने कधी नव्हे ते कक्ष अधिकाऱ्याचीदेखील साक्ष घे्तली. मात्र समितीपुढे वस्तुस्थितीवर आधारीत माहिती समितीसमोर येऊ शकली नाही. त्यामुळे समितीला संबंधीत प्रकरणाच्या पाहिजे तेवढया खोलात जाऊनही म्हणावे तेवढे यश आले नाही. म्हणून या प्रकरणी समितीने आणखी खोलात जाऊन माहिती विचारावयाची असल्याने समितीने सांस्कृतिक कार्य विभाग, वित्त विभाग, सामान्य प्रशासन विभाग, गृह (लाचलुचपत प्रतिबंधक व आर्थिक गुन्हे अन्वेषन) विभाग यांच्या विभागीय सचिवांची व वरिष्ठ अधिकाऱ्यांची अनुक्रमे दि.१५ मे, २२ मे, ६ जून, १९ जून,२००७ रोजी साक्ष घेतली. हे सर्व विभागीय सचिव, मुख्य सचिवांच्या अधिपत्याखाली काम करतात म्हणून समितीस वस्तुस्थितीवर आधारीत माहिती दबावामुळे मिळाली नाही अशी समितीची धारणा झाल्याने समितीने दिनांक १९ जून, २००७ रोजी मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांना पत्र पाठवून समितीसमोर साक्ष देण्याकरिता विनंती करण्यात आली. मात्र शासनाचे मुख्य सचिव समितीसमोर साक्ष देण्यास येऊ शकले नाहीत व त्यांनी ते समितीसमोर येऊ शकणार नाहीत. यासंदर्भातील पत्र मुख्य सचिवांनी त्यादिवशी ४.१५ वाजता म्हणजे समितीची साक्ष संपल्यानंतर पाठविले यावरुन या प्रकरणात शासनाला किती गांभीर्य आहे याची समितीस कल्पना येते व एकंदरच या प्रकाराबाबत समिती आणखी तीव्र नापसंती व्यक्त करते.

**प्रस्तुत प्रकरणात श्री. गोविंद स्वरुप यांची विभागीय चौकशी करण्यासाठी शासनाने श्री.डी.एन. चौधरी यांना चौकशी अधिकारी म्हणून नेमले होते. तथापि, री.गोविंद स्वरुप यांनी उघडपणे कोट्यावधी श्रुपयाचा गैरव्यवहार करुनही तसेच त्याबाबत सर्व पुरावे उपलब्ध असताना श्री. डी.एन. चौधारी यांनी श्री. गोविंद स्वरुप यांना निर्दोष मुक्त केले याचे समितीला सखेद आश्चर्य वाटते. एकूणच श्री. चौधरी यांच्या चौकशी करण्याच्या कार्यपध्दतीबाबत शंका व्यक्त करुन समिती तीव्र नापसंती व्यक्त करते. श्री. चौधरी यांनी चौकशीअंती काढलेला निष्कर्ष पहाता श्री. चौधरी हे विश्वासार्ह व्यक्ती नाहीत असेच म्हणावे लागेल. सबब, यापुढे शासनाने श्री. डी.एन. चौधरी यांचेवर कोणतीही जबाबदारी सोपवू नये अशी समितीची शिफारस आहे**.

## दोन : "सुपरस्टार धमाका उत्पादनामधील अनियमितता"

२.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००३-२००४ च्या (वाणिज्यिक) अहवालातील परिच्छेद क्रमांक ४.४ मध्ये **"सुपरस्टार धमाका उत्पादनामधील अनियमितता "** यासंबंधात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले आहे की,

खाजगी संस्थेला अनियमित वित्तीय सहाय्य करण्यात आले.

१. या करारासाठी संचालक मंडळाची मान्यता मिळविण्यात आली नव्हती.

२. करार कंपनी व सेट यांच्यामध्ये झालेला असतांनाही "हम एक है- फिल्मसिटी" (एचईएच) या नावांचे संयुक्त खाते जे फक्त कंपनी कार्यचालित करत नव्हती तर कंपनीचा वित्तीय सल्लागार व मुख्यलेखाधिकारी व मॉन्टेजचा मालक हे संयुक्तपणे कार्यान्वित करित होते. अशा खात्यांत देय रक्कम जमा करावी अशी हस्तलिखित दुरुस्ती समाविष्ट करण्यात आली होती. ही अशी दुरुस्ती करारामध्ये का जोडण्यात आली याबाबतची कारणे कागदोपत्री उपलब्ध नव्हती. सेटने एचईएच खात्यामध्ये (एप्रिल-मे २००२) रुपये तीन कोटी जमा केले. मॉन्टेजच्या मालकाने ती रक्कम एप्रिल, २००२ ते डिसेंबर, २००३ या कालावधीत रोख/धनादेशाद्वारे खात्यातून काढून घेतली.

३. नियोजित केलेल्या १३ उपख्यांनऐवजी कंपनीने फक्त एका उपख्यानाची निर्मिती केली. उर्वरित उपख्यानांच्या निर्मितीसाठी रु.तीन कोटीच्या तीन हप्त्यांमध्ये असे एकूण रु. ९ कोटीचे वित्तीय सहाय्य मिळविण्यासाठी कंपनीने गार्नेट पेपर मिल्स मर्यादित (जीपीएमएल) बरोबर करार स्वाक्षरित केला (ऑगस्ट, २००२) होता. कंपनीला प्रत्येक रुपये तीन कोटीवर रुपये ३५ लाख एवढा सेवाआकार द्यावयाचा होता. आश्चर्यकारकरित्या जीपीएमएलकडून कंपनीच्या नावावर असलेला रुपये १.५० कोटीचा धनादेश मिळाला तो कंपनीने फक्त स्वतःच्या खात्यात जमा

करण्याऐवजी एचईएचच्या खात्यात जमा (ऑगस्ट २००२) केला. परिणामी स्वरुप, जीपीएमएलकडून मिळालेली रुपये १.५० कोटीची रक्कम श्री. शाहब अहमद याने काढून घेतली.

कंपनीने सेट बरोबर केलेल्या करारामध्ये १३ उपख्यानाच्या निर्मितीबाबत मॉन्टेज बरोबर कोणताही करार झालेला नसतांना सेटकडून मिळालेला पैसा "एचईएच"खात्यात जमा करण्याचे प्रावधान विनिर्दिष्टित करणे व जीपीएमएलकडून मिळालेला धनादेश खात्यात जमा करणे खूपच आक्षेपार्ह होते. उर्वरित १२ उपख्यानांपैकी एकाचीही निर्मिती कंपनीने केली नाही व कंपनीला सेट व जीपीएमएल यांना रुपये ४.५० कोटी परत करण्याचे दायित्व स्वीकारावे लागले त्या व्यतिरिक्त जीपीएमएलला रुपये १७.५० लाखाचा सेवा आकारही द्यावा लागला होता. शासनाने/कंपनीने त्यांच्या उत्तरात (मे २००४) झालेला करार कंपनीच्या हिताचा नव्हता हे मान्य केले व मॉन्टेजचा मालक व कंपनीच्या दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येत होती असे म्हटले होते.

२.२ या प्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमूद केले की,

महामंडळाचे तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक मंडळाचे मान्यतेविना मे. सेट इंडिया प्रा.लि. यांचेशी दि.१०/०४/२००२ रोजी करारनामा केला होता.

आक्षेपात नमूद केलेप्रमाणे दि.१२/०४/२००२ चे करारामध्ये हस्तलिखित दुरुस्ती समाविष्ट केली असल्याची बाब सत्य आहे. तसेच एचईएच-फिल्मसिटी या संयुक्त खात्यात रु.३.०० कोटी जमा केले असल्याची बाब ही सत्य आहे. तथापि, ज्या वेळेस महामंडळाचे संचालक मंडळाचे विषयांकित कराराबाबत निदर्शनास आले, त्याबाबत संचालक मंडळाने त्यांचे ७८ व्या बैठकीत सदर करार रद्द / नाकारणेबाबत वरिष्ठ विधी सल्लागार यांचे अभिप्राय घेणेबाबत ठराव पारित केला. याबाबत महाराष्ट्र शासनाचे महाअभियोक्ता यांचे दि.१५/०१/२००३ रोजीच्या पत्रानुसार, त्यांनी विषयाधीन करार महामंडळाचे हिताचा नसल्याचे अभिप्रायात नमूद केले होते. त्या अनुषंगाने

महाअभियोक्ता यांचे अभिप्रायानुसार संचालक मंडळाचे ७९ व्या बैठकीत ७९/६ या विषयान्वये महामंडळ व मेसर्स सेट इंडिया यांच्यामध्ये झालेल्या करारासंदर्भात सर्व मुळ अभिलेख कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे व तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक यांनी केलेला करार महामंडळाचे संचालक मंडळाचे मान्यतेने केलेला नसल्याने व महामंडळाचे हितार्थ आढळून न आल्याने, संचालक मंडळाकडून झालेला करार नाकारण्यात (Disown) आला. आक्षेपात नमूद केल्यानुसार मेसर्स सेट इंडियाकडून जमा झालेली रु. ३.०० कोटीची रक्कम नियमबाह्यरित्या HEH-Film City या खात्यामध्ये जमा केली हे सत्य आहे व रक्कम मोंटाजचे मालक यांनी खात्यामधून काढून घेतली असे बँकेच्या विवरणपत्रावरुन स्पष्ट होते.

उपलब्ध अभिलेख्यावरुन असे आढळून येते की, महामंडळाने "सुपरस्टार धमाका" या कार्यक्रमाचे नियोजित १३ उपख्यांनाऐवजी फक्त एका उपख्यानाची निर्मिती केली. आक्षेपात नमूद केलेल्या इतर बाबी सत्य आहेत. त्याचप्रमाणे मे. गार्नेट पेपर मिल्स यांचेसोबत दि.०८/०८/२००२ रोजी महामंडळाचे संचालक मंडळाचे मान्यतेविना करण्यात आलेला करारसुध्दा वरिष्ठ विधी सल्लागार यांचे अभिप्रायासाठी पाठविण्यात आला. महाराष्ट्र शासनाचे महाअभियोक्ता यांचे अभिप्रायानुसार महामंडळाचे संचालक मंडळाने त्यांचे ७९ व्या बैठकीत सदर करार रद्द / नाकारण्यात यावा असे ठरविले. विषयाधीन करार महामंडळाचे संचालक मंडळाचे मान्यतेविना करणेत आला असल्याचे व तो महामंडळाचे हितार्थ नसल्याने व त्यापोटी प्राप्त रकमा महामंडळाचे प्राधिकृत निधी खात्यामध्ये जमा झालेल्या नसल्यामुळे ठराव क्रमांक ७९/६ अन्वये सदर करार रद्द/नाकारणेत आला. आक्षेपात नमूद केलेल्या इतरबाबी सत्य आहेत. तसेच मे. सेट इंडिया प्रा. लि. यांनी महामंडळाचे विरुध्द लवादाकडे तक्रार नोंदविली असून सदर बाबतीत महामंडळाचे विधी सल्लागार यांनी विषयाधिन करार महामंडळाने नाकारला असल्याने तो महामंडळावर बंधनकारक नसल्याचे लवादापुढे मुद्दा मांडला असून, त्यामुळे सदर बाब लवादाचे अख्यत्यारित नसल्याचे निदर्शनास आणले आहे. तथापि, लवादाचे अंतिम निर्णय प्राप्त झाले नंतर विधी सल्लागार यांचे अभिप्रायानुसार पुढील कार्यवाही अनुसरावी लागेल. तसेच या प्रकरणी महामंडळाचे तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक व

तत्कालीन वित्तीय सल्लागार व मुख्यलेखाधिकारी हे विषयाधीन नियम बाह्यतेस जबाबदार असल्याचे उपलब्ध अभिलेख्यांवरुन स्पष्ट होते. आक्षेपात नमूद केलेली बाब सत्य आहे. संचालक मंडळाने ७९/६ च्या ठरावान्वये विषयाधीन सर्व करार नाकारले असल्यामुळे व सदर निर्णय महाराष्ट्र शासनाचे महाअभियोक्ता यांचे अभिप्रायानुसार घेतला असल्यामुळे एकूण रु.४.५० कोटीची मे.सेट इंडिया व मे. जीपीएमएल यांची रक्कम व रु.१७.५० लक्ष सेवाशुल्काच्या रकमेचे दायित्व स्विकारण्यास नकार दिलेला आहे. तसेच या बाबतीत महामंडळाने दि.१०/०४/२००३ रोजी पोलिस विभागाचे आर्थिक गुन्हे शाखा यांचेकडे श्री. शाहब अहमद, श्री. गोविंद स्वरुप व श्री. अ.ग. शुक्ल यांचेविरुध्द निधीचे दुरुपयोगाबाबत तक्रार नोंदविली आहे. तसेच तत्कालीन वित्तीय सल्लागार व मुख्यलेखाधिकारी श्री. अ.ग.शुक्ल यांना त्यांनी केलेल्या नियमबाह्य कृतीबद्दल महामंडळाचे सेवेमधून बडतर्फ केले आहे. त्याचप्रमाणे तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक श्री. गोविंद स्वरुप यांनी केलेल्या नियमबाह्य कृतीबद्दल त्यांचेविरुध्द योग्य ती कारवाई करणेबाबत शासनास प्रस्ताव सादर केला आहे.

२.३ महामंडळाच्या वरील अभिप्रायाशी शासनाने खालील प्रमाणे मत व्यक्त केले आहेत. महामंडळामध्ये आढळून आलेल्या अनियमिततेच्या संदर्भात महामंडळाने केलेल्या कार्यवाही शिवाय शासन पातळीवर तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक श्री. गोविंद स्वरुप यांचे विरुध्द विभागीय चौकशी आदेशीत करण्यात आली. त्या चौकशीचा अहवाल प्राप्त झालेला असून शासनस्तरावर अहवालाचे परिक्षण करण्यात येत आहे. त्याशिवाय सदर प्रकरण लाचलुचपत अधिकाऱ्याकडे सोपविण्यात आलेले असून त्यांनी तपास पूर्ण करुन अंतिम अहवाल सादर केलेला आहे. लाचलुचपत अधिकाऱ्याकडून प्राप्त झालेल्या अहवालाची छाननी वरिष्ठ कायदेशीर सल्लागार यांचेमार्फत करण्यात येत आहे.

२.४ या प्रकरणी समितीने महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक आणि पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव, यांची १५ व २२ मे, ६ व १९ जुन, २००७ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी व्यवस्थापकीय संचालकांनी या संदर्भात अशी माहिती दिली की,

दिनांक १२/४/२००२ रोजी सेट इंडियाबरोबर महामंडळाकडून करार करण्यात आला. सेट इंडिया म्हणजे सोनी टी. व्ही. चॅनेल. त्यांना १३ भाग महामंडळ आणि मोंटाज कंपनीने तयार करुन द्यायचे होते आणि सोनी टी. व्ही. ने ते प्रसारित करावयाचे यासाठी हा करार करण्यात आला होता. त्याकरिता अग्रीम रक्कम म्हणून सोनी टी.व्ही. ने तीन कोटी रुपये चित्रनगरी महामंडळाला दिले होते. परंतु ही रक्कम पुन्हा "हम एक है" या शाहब अहमद यांच्या नविन खात्यावर जमा करण्यात आली. १३ भागांपैकी फक्त एक भाग तयार करण्यात आला. तो भागसुध्दा सदोष असल्यामुळे पूर्ण रक्कम प्रदान करण्यात आली नव्हती. ७५ लक्ष रुपयाऐवजी केवळ ६० लक्ष रुपये रक्कम देण्यात आली. महामंडळाच्या लक्षात ही बाब आल्यानंतर दिनांक १८/१/२००३ रोजी हा करार रद्द करण्यात आला. त्यामुळे सेट इंडिया महामंडळाच्या विरोधात लवादामध्ये गेली. कारण ३ कोटी रुपयामध्ये केवळ एकच भाग बनविला होता व तोही सदोष असल्यामुळे महामंडळाने व्याजासह ३ कोटी रुपये परत करावेत असे त्यांचे म्हणणे होते. यासंबंधी महामंडळाच्या संचालक मंडळाचे मत काय होते याबाबत विचारणा केली असता, सांस्कृतिक कार्य सचिवांनी खुलासा केला की, संचालक मंडळासमोर या सर्व गोष्टी आल्यानंतर त्यांनी एक चौकशी समिती स्थापन केली. चौकशी समितीने आपला अहवाल सादर केल्यानंतर त्याअनुषंगाने संचालक मंडळाने वेगवेगळे ठराव केले. त्यानुसार पहिल्यांदा जे सर्व करार करण्यात आले होते ते रद्द करण्यात आले. या करारांमध्ये "हम एक है" गार्नेट पेपर मिल्स व सेंट इंडिया या करारांचा समावेश होता. संचालक मंडळाने हे सर्व ठराव, महाअधिवक्ता यांचे मत विचारात घेऊन पारित केले होते. आणि करार रद्द केले होते. त्यानंतर संचालक मंडळाने या प्रकरणांची संपूर्ण चौकशी करुन शासनाला एक अहवाल सादर केला होता.

महामंडळाच्या संचालक मंडळाने शासनाला सादर केलेल्या अहवालातील शिफारशींचे स्वरुप काय होते याबाबत समितीने विचारणा केली असता, सांस्कृतिक कार्य सचिवांनी पुढीलप्रमाणे माहिती समितीला दिली.

On consideration of the facts and findings noted above the Enquiry Committee is of the unanimous opinion that criminal proceedings be launched forthwith against Mr. Govind Swarup, the then Managing Director, Mr. A.G. Shukla, Finance and Accounts Officer, Mr. Shahab Ahmed, proprietor M/s Montage by lodging a criminal complaint on the grounds and charges listd below.

1) Misrepresentation of the Board of Directors and Corporation.
2) Criminal breach of trust by going beyond the mandate and even where mandate did not exist.
3) Cheating and misleading the Board of Directors by prevaricating the facts.
4) In collusion with Private party Mr.Shahad Ahmed, Mr. Govind Swarup and Mr.A.G. Shukla the custodians of the MFSDC and Government .

The Enquiry Committee hereby concludes that criminal complaints on grounds listed above be launched forthwith against 1. Mr. Govind Swarup 2. Mr. A.G.Shukla 3. Shahab Ahmed, raised funds at a great cost, committed a fraud on corporation and fraudulantly directd the funds to the determents of MSFC and Government.

सर्वश्री. रामदास फुटाणे, सुनिल बर्वे आणि अंजली पाठारे या तीन सदस्यांच्या समितीने संचालक मंडळाला सदर अहवाल सादर केला होता. हा अहवाल २००४ मध्ये शासनाला सादर झाला होता. त्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने चौकशी केली. शासनाने अहवाल लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे केंव्हा पाठविला, त्याची छाननी करण्यात आली व त्याची सद्य:स्थिती काय आहे ? या समितीच्या प्रश्नावर सचिवांनी उत्तर दिले की, त्या अहवालाच्या छाननीनंतर संबंधितांना अटक करण्यात आलेली आहे आणि सद्या ते जामिनावर सुटले आहेत व प्रकरण न्यायप्रविष्ट आहे असे स्पष्ट केले. अहवाल शासनास २००४ मध्ये सादर झाला होता. चौकशी करुन अटकेची कारवाई करण्यासाठी फेब्रुवारी,२००७ उजाडला. तेंव्हा या प्रकरणी वेळ काढूपणा

झालेला आहे हे उघड आहे. कारण ऑगस्ट, २००६ मध्ये श्री. गोविंद स्वरुप सुखरुप सेवानिवृत्त झाले आहेत. तोपर्यंत याप्रकरणी कारवाई झालेली नाही. तेव्हा ज्या अधिकाऱ्यांनी वेळकाढूपणा केला तेसुध्दा याप्रकरणी जबाबदार दिसून येतात. प्रश्न केवळ पैशांचा नाही तर भविष्यात असे गोविंद स्वरुप निर्माण होता कामा नयेत या दृष्टीने कारवाई होणे आवश्यक होते. म्हणून या संपूर्ण प्रकरणाची माहिती समितीला देण्याची मागणी करण्यात आली असता, सचिवांनी तसे कबूल केले व जी माहिती समितीला सादर करण्यात आली त्यामध्ये वरील माहितीचाच पुनरुच्चार करण्यात आला आहे.

श्री. गोविंद स्वरुप, तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळ यांचे प्रकरण चौकशीसाठी गृह विभागाकडे आले होते काय ? याबाबत गृह विभागाच्या सचिवांकडे विचारणा केली असता, त्यांनी समितीसमोर सविस्तर खुलासा केला की, या प्रकरणाची सुरुवात सन १९९९ मध्ये झाली, होती याची चौकशी करण्यासाठी शासनाने एक समिती नियुक्त केली होती. शिवाय चौकशी करण्यासाठी मार्च, २००४ मध्ये लाचलुचपत प्रतिबंधक विभागालाही आदेश देण्यात आले होते. त्यानुसार त्या विभागाने दिनांक ३१ जुलै, २००४ रोजी या प्रकरणी गुन्हा दाखल केला होता. त्यामध्ये गोविंद स्वरुप, अ.ग. शुक्ल व श्रीमती आर. विमला या तिघांवर आरोपपत्र ठेवण्याचे प्रस्तावित केले. गोविंद स्वरुप व अ.ग. शुक्ल यांच्यावर आरोपपत्र ठेवण्यास शासनाची परवानगी मिळाली. त्यानुसार त्यांना अटक करण्यात आली. परंतु श्रीमती विमला यांच्यावर आरोपपत्र ठेवण्यासाठी त्यांच्या महसूल व वन विभागाने परवानगी न दिल्याने आरोपपत्र ठेवता आले नाही. कोणत्याही अधिकारी वा कर्मचाऱ्यांवर आरोपपत्र ठेवताना संबंधित विभागाची परवानगी घेणे आवश्यक असल्याची तरतूद कायद्यात असल्याने परवानगी घेऊनच केस दाखल करता येते. आरोपपत्र दाखल करण्यासाठी पाच वर्षाच्या लागलेल्या विलंबाबाबत सांगण्यात आले की, सदर प्रकरण लाचलुचपत विभागाकडून गृह विभागाकडे डिसेंबर, २००५ मध्ये आले होते. यातील दोषी व्यक्तींवर केस दाखल करण्यासाठी परवानगी मिळाली म्हणून दिनांक ८ मार्च, २००६ रोजी संबंधित विभागांना कळविले होते. चार्जशिट

दाखल करण्यास परवानगी देण्याबाबत काही मार्गदर्शक तत्वे आहेत काय? याबाबत सामान्य प्रशासन विभागाच्या अप्पर मुख्य सचिवांनी खुलासा केला की, गैरव्यवहार / भ्रष्टाचाराच्या प्रकरणामध्ये संबंधित विभागाची परवानगी घ्यावी लागते हे खरे असले तरी किती दिवसात परवानगी घ्यावी/द्यावी याबद्दल निश्चित नियम नाहीत. तथापि, लवकर परवानगी देण्याची कार्यवाही केली जाते. तरीसुध्दा या प्रकरणात मोठ्या प्रमाणात विलंब लागलेला आहे असे मत समितीने व्यक्त केले.

या प्रकरणाची लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने चौकशी केल्यानंतर त्यांना काय आढळून आले अशी समितीने विचारणा करता, त्या विभागाचे अप्पर महासंचालक (श्री. पारसनीस) यांनी समितीला सविस्तरपणे अशी माहिती दिली की, त्यांच्या विभागाने या प्रकरणी सखोल चौकशी केलेली आहे. महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी व सांस्कृतिक कार्य महामंडळाने श्री. शाहब अहमद या खाजगी व्यक्तिशी "हम एक है" कार्यक्रम करण्यासाठी संचालक मंडळाची परवानगी न घेता करारनामा केला होता. या कार्यक्रमाच्या फायद्या / तोट्याची सर्व जबाबदारी श्री. शाहब अहमद यांची होती. करारानुसार त्यांच्याकडून महामंडळाला २५ लाख रुपये फी मिळणार होती. महामंडळाने श्री. शाहब अहमद यांना केवळ प्रशासकीय मदत करावयाची हाती. यामध्ये तोटा झाला तरी त्याचा आर्थिक बोजा शाहब अहमद यांच्यावरच पडणार होता, महामंडळावर नव्हे. ज्या दिवशी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता त्याच दिवशी गुजरात येथे भूकंप झाल्याने कार्यक्रम पुढे ढकलावा लागला. त्यामुळे शाहब अहमद यांना तोटा झाला होता व त्याची कसलीही जबाबदारी महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी व सांस्कृतिक कार्य महामंडळावर नव्हती. तरीदेखील महामंडळाने तोटा स्वतःवर लादून घेतला व वेगवेगळ्या टी. व्ही. चॅनेल्स कंपन्यांशी करार करुन झालेला तोटा भरुन काढण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यातून महामंडळ अधिकच तोट्यात गेले. पर्यायाने शाहब अहमद यांना हा तोटा न होता महामंडळाला होत गेला. या तोट्याची रक्कम ६ कोटी रुपये आहे. ती महामंडळाने स्वतःवर लादून घेतलेली आहे. म्हणून महामंडळावर तसा ठपका आरोपपत्रात ठेवण्यात आला आहे.

तसेच इंटर ड्रींक्स कंपनीबरोबर केलेल्या करारात १२ लाख ५० हजार रुपये आणि निलमुद्रा कंपनी बरोबर केलेल्या करारात १ कोटी ७० लाख रुपये तोटा झालेला आहे. हा सर्व तोटा शाहब अहमद यांना व्हायला हवा होता. परंतु महामंडळाने तो तोटा स्वत:हून आपल्यावर घेतलेला आहे. म्हणून या प्रकरणात जे दोषी आहेत त्यांच्यावर आरोपपत्र (चार्जशीट) दाखल केलेले आहे.

वरील सर्व माहिती घेतल्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, हे तीन अधिकारी गैरव्यवहारास जबाबदार असल्याने त्यांच्यावर खटला दाखल केला आहे. परंतु त्यांची मालमत्ता जप्त करुन व झालेल्या नुकसानीची रक्कम वसूल होणे क्रमप्राप्त आहे. त्यादृष्टिने सर्व तपास करुन, धाडी टाकून या पैशांचा शोध घेतला पाहिजे. अन्यथा, सेवानिवृत्तीला आलेले अधिकारी १०-१५ कोटींचा गैरव्यवहार करुन मोकळे होतील व त्याचा भूर्दंड शासनावर पडेल. त्यामुळे ज्यांनी भ्रष्टाचार केला आहे. त्यांना कोणत्याही परिस्थितीत मोकळे सोडता कामा नये. नाहीतर इतर अधिकारी सुध्दा याच मार्गाचा अवलंब करतील. समितीच्या या मताशी सहमती दर्शवून अप्पर महासंचालकांनी सुध्दा हा मुद्दा अधिक स्पष्ट करताना सांगितले की, **ज्यांनी गैरव्यवहार केलेला आहे त्यांची मालमत्ता जप्त करण्याबाबतचा निर्णय शासनालाच घ्यावा लागेल.** समितीने पुढे अशीही विचारणा केली की, भ्रष्टाचार झाल्याचे आपण मान्य केले आहे. त्यामुळेच शासनाने आपल्या विभागाकडे चौकशी दिलेली आहे. परंतु आपल्या विभागाने याप्रकरणी नेमकी कोणती कामगिरी केली आहे, आरोपपत्र किती तारखेला दाखल केले आहे आणि नेमके कोणते आरोप चार्जशीटमध्ये ठेवले आहेत या प्रश्नास सविस्तर उत्तर देताना, अप्पर महासंचालकांनी माहिती दिली की, या प्रकरणी इंडियन पिनल कोडच्या कलम ४०९,४२०, १२० (ब), १३, १३ (क), १३ (ड) आणि १३ (२) अन्वये गुन्हा नोंदविला आहे. श्री. गोविंद स्वरुप यांनी संचालक मंडळापासून बऱ्याच गोष्टी लपवून ठेवल्या होत्या. कोणत्याही प्रकरणात संचालक मंडळाची परवानगी घेतलेली नाही. सगळ्याच व्यवहारात बेकायदेशीरपणे पैसा वर्ग केलेला आहे. खर्चाची देयकेही फिरवली आहेत. उदाहरणादाखल त्यांनी काही नांवे दिली ती अशी-इंटरड्रिंक्स कंपनी बरोबर दिनांक ३१/१२/२००५ रोजी करारकरुन "सुपरस्टार

धमाका"कार्यक्रम आयोजित केला होता. त्यात रु.२५ लाखांची बँक गॅरन्टी देण्यात आली. सदर कंपनी महामंडळास ३१ लाख २० हजार रुपये परत करणार होती. परंतु १२ लाख ५० हजार रुपयेच परत आले. यामध्येही तोटा झाला. सोनी कंपनीसोबत १३ भागांची मालिका बनविण्यासाठी १३ कोटी रुपयांचा करार करण्यात आला, यात ३ कोटींची रक्कम त्यांच्याकडून आगाऊ देण्यात आली होती. परंतु ती "हम एक है" च्या खात्यात जमा करण्यात आली अशी मालिका महामंडळ निर्माण करु शकले नाही. परिणामी, महामंडळावर आर्थिक बोजा वाढला. नंतर १३ भागांच्या मालिकेसाठी मे. गार्नेट पेपर मिल्स यांच्याबरोबर करार करण्यात आला. मिळालेली रक्कम "हम एक है" च्या खात्यात जमा करण्यात आली. मालिका सुरु होऊ शकली नाही. परिणामी] दीड कोटीचा बोझा परत महामंडळावर वाढला. त्यानंतर निलमुद्रा कंपनीशी दिनांक ४/३/२००२ ला करार करण्यात आला. संचालक मंडळाची मान्यता घेण्यापूर्वीच रक्कम रु. ७५ लाख आगाऊ घेतली होती. महामंडळाच्या बैठकीत सदर प्रस्तावास मान्यता नाकारुन **प्रस्ताव 'शासनासमोर ठेवावा अशा सूचना देण्यात आल्या. परंतु रक्कम देण्यात आली होती ही माहिती लपवून ठेवण्यात आली. शासनाकडे प्रस्ताव प्रलंबित असतानाच व्यवस्थापकीय संचालकांनी तो प्रस्ताव मान्य करुन अतिरिक्त रक्कम रु. १ कोटी २० लाख व रु. १ कोटी ९५ लाख मान्य करुन घेतले. खरे तर या प्रस्तावास शासनाची परवानगी घेऊनच मान्यता घेणे आवश्यक होते. परंतु अशा बेकायदेशिर गोष्टी चालू ठेवण्यात येऊन पैसा खाजगी कंपनीला देण्यात आल्याने महामंडळास तोटा सोसावा लागला. श्री. शाहब अहमद यांना १२ कोटी ८३ लाख ७६८ इतक्या रकमेचा फायदा करुन देण्यात आलेला आहे.**

शासनाने चौकशीसाठी जे प्रकरण लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे दिले होते ते देण्यामागच्या हेतू बद्दल सामान्य प्रशासन विभागाच्या अप्परसचिवांनी खुलासा केला की, **अधिकाऱ्यांच्या वर्तणूकीमुळे जर शासनाचा किंवा शासनाच्या संस्थांचा तोटा झाला असेल तर, तो तोटा भरुन काढण्यासंबंधी कायद्याप्रमाणे कार्यवाही करावी लागते. तसेच या प्रकरणी जो गैरव्यवहार झालेला आहे तो अगदी जाणून बूजून झालेला आहे याचीसुध्दा दखल सामान्य प्रशासन विभागाने घेतलेली आहे. यामध्ये कोट्यावधी**

**रुपयांची अफरातफर झालेली आहे. हे शासनाच्या लक्षात आलेले आहे.** यामध्ये डायरेक्ट गुन्हा घडल्यामुळे आपण डायरेक्ट पोलीस स्टेशनमध्येच गुन्हा नोंदवावयास पाहिजे होता तो कां. नोंदविण्यात आला नाही ? याप्रकरणी एसीबीकडे चौकशी दिल्याने फार वेळ गेलेला आहे. गोविंद स्वरुप यांना पाठिशी घालावयाचे होते म्हणून एसीबीकडे चौकशी दिली असे समितीचे मत झाले आहे. कारण त्या चौकशीस वेळ लागणार होता. पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करता आला असता परंतु तसे मुद्दाम केलेले नाही. खालच्या अधिकाऱ्यांना हाताशी धरुन त्यांनी हा गैरव्यवहार केलेला आहे. म्हणून एसीबी कडे चौकशी देण्याची गरज कां भासली ? डायरेक्ट गुन्ह्याची नोंद पोलीस स्टेशनमध्ये का केली नाही ? या समितीच्या प्रश्नावर अप्पर महासंचालकांनी (श्री. पारसनीस) खुलासा केला की, प्रिव्हेंशन ऑफ करप्शन ॲक्ट खालील तपास डीवायएसपी किंवा त्यावरील अधिकाऱ्यांकडे दिला जातो. त्यांच्या मार्गदर्शनाखाली एसीबी च्या पोलीस निरीक्षकाची मदत घेण्यात येते. समितीने विचारणा केली की, श्री. स्वरुप यांच्या फाईलसंबंधी सामान्य प्रशासन विभागाने नेमकी कोणती भूमिका घेतली, याबाबत आपणास जी माहिती असेल ती समितीला द्यावी व ती फाईलसुध्दा दाखवावी. यावर अप्पर मुख्य सचिवांनी (सामान्य प्रशासन विभाग) सांगितले की, त्यावेळी नेमका काय विचार होता याची त्यांना आता माहिती नाही. परंतु सामान्य प्रशासन विभागाच्या कक्ष अधिकाऱ्यांनी खुलासा केला की, एसीबीच्या चौकशींच्या अहवालास गृह विभागाने मान्यता दिल्यानंतर ती फाईल सामान्य प्रशासन विभागाकडे आली. सामान्य प्रशासन विभागाने अभिप्राय घेण्यासाठी ती फाईल विधी व न्याय विभागाकडे पाठविली व त्यानंतर संबंधितांवर खटला दाखल करण्याच्या सूचना देण्यात आल्या. त्यावेळी सामान्य प्रशासन विभागाचे सचिव श्री. नवीन कुमार हे होते. सांस्कृतिक कार्य विभागाचे व विधी व न्याय विभागाचे अभिप्राय मिळाल्यानंतरच खटला दाखल करण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाने मंजूरी आदेश काढले. यामध्ये खटला दाखल करण्यासाठी परवानगी देणारी सक्षम प्राधिकारी संस्था कोण अशी विचारणा केली असता, अप्पर मुख्य सचिवांनी खुलासा केला की, यामध्ये सक्षम प्राधिकारी संस्था सामान्य प्रशासन विभाग आहे. दिनांक ३ एप्रिल, २००० चा सामान्य प्रशासन

विभागाचा शासन निर्णय आहे त्यामध्ये अभियोग दाखल करण्याच्या दृष्टिने मंजूरी देण्याबाबत सविस्तर माहिती दिलेली आहे. परंतु एसीबीचा दिनांक ९/१/२००१ चा अहवाल गृह विभागाकडे जाऊन तो सामान्य प्रशासन विभागाकडे दिनांक १४/३/२००६ रोजी आलेला होता. या फाईलवर केलेल्या नोटींगची माहिती समितीला नंतर सादर करण्याचे त्यांनी कबूल केले. तसेच ही चौकशी करण्यासाठी गुन्हा अन्वेषण विभागाकडे प्रकरण पाठविले. त्यावेळी प्रधान सचिव कोण होते ही माहिती देण्यास त्यांनी असमर्थता व्यक्त केली. तसेच गोविंद स्वरुप यांची बदली नंतर कोणत्या विभागात केली याचीही त्यांना माहिती नव्हती. त्यांच्या विभागाकडे प्रकरण जाण्यापूर्वी जे निर्णय झाले आहेत ते तशाप्रकारे कां घेण्यात आले याबद्दल माहिती देण्यास त्यांनी असमर्थता व्यक्त केली.

या प्रकरणी विभागीय चौकशी करण्यासाठी श्री. डी.एन. चौधरी यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. दिनांक ५/९/२००५ रोजी सामान्य प्रशासन विभागास प्रस्ताव पाठविण्यात आला होता त्यावेळी प्रधान सचिव (सेवा) या पदावर श्रीमती चारुशीला सोहोनी (भा.प्र.से) कार्यरत होत्या. त्यांनी श्री. चौधरी यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक केली होती. परंतु चौकशी अधिकाऱ्यांची नेमणूक करण्याचे कोणतेही कारण नव्हते. तो एक बनाव होता असे समितीचे स्पष्ट मत आहे. या प्रकरणास विलंब कसा करता येईल व श्री. गोविंद स्वरुप यांना निर्दोष कसे सोडता येईल अशी या पाठीमागची भूमिका होती. कारण श्री. चौधरी यांनी प्रकरणी असा अहवाल दिला की, या प्रकरणात गैरव्यवहार झालेला नसून या प्रकरणातील संबंधित व्यक्ती निर्दोष आहेत. या अहवालात गोविंद स्वरुप यांना क्लीनचीट देण्यात आलेली आहे. प्रधान सचिव गृह (विशेष) यांनी या चौकशीबाबत समितीला अशी माहिती दिली की, या चौकशीमध्ये ज्या अटी असतात त्यानुसार त्या व्यक्तिला तुरुंगामध्ये जावे लागत नाही. परंतु त्याला बडतर्फ करता येते, त्याचा पगार कमी करता येतो. ही चौकशी सामान्य प्रशासन विभागामार्फत करण्यात येते. त्यानंतर अप्पर मुख्य सचिव (श्रीमती झुत्सी) यांनी माहिती दिली की, चौधरी यांनी त्यांच्या निर्णयामध्ये सहा कलमे दिली आहेत. मोठ्या प्रमाणात चौकशी झाली आहे. परंतु त्यांनी त्यांच्या अहवालामध्ये जे

निष्कर्ष काढले आहेत त्याच्याशी शाासन सहमत नाही. या चौकशी समितीसमोर सरकारची बाजू मांडण्यासाठी श्री. ज.वि. दिवान, उप सचिव यांची नेमणूक करुन सादरकर्ता अधिकारी (I) हे पद निर्माण करण्यात आले. चौधरींचा अहवाल अमान्य करण्याचे कारण याबाबत सामान्य प्रशासन विभागाने नोटमध्ये १३ कारणे देण्यात आलेली आहेत. त्यातील एकदोन कारणे त्यांनी खालीलप्रमाणे वाचून दाखविली

It is felt that Smt. Vimla specifically wanted to see any document in the original . She could have been allowed to do so particularly since she was claming that the original had some extra remarks on it. However, this request was rejected by the IA. Also if the IA had any suspicion about the request of Shri Poman, he may have made the enquireies. He suddenly concluded that this suppports the submission of CO though the records have been selectively produced.

समितीने साक्षीच्या वेळी मागणी केल्यानुसार दिनांक १/१०/२००२ पासून मुख्य सचिव पदावर कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांची यादी तसेच प्रधान सचिव / अप्पर मुख्य सचिव (सेवा) सामान्य प्रशासन विभाग या पदांवर दिनांक ३१/३/२००१ पासून कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांची नांवे तसेच व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र चित्रपट व रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळ व सचिव / प्रधानसचिव, सांस्कृतिक कार्य विभाग या पदांवर दिनांक १/१/२००२ पासून कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांची यादी सामान्य प्रशासन विभागाने पाठविलेली आहे. त्यानुसार सदर नांवे खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

| **अ.क्र.** | **अधिकाऱ्याचे नाव** | **कालावधी** | **पदाचे नाव** |
|---|---|---|---|
| १. | श्री. बालकुमार अग्रवाल | दि.३१/३/२००१ ते ३०/१०/२००२ | अप्पर मुख्य सचिव सामान्य प्रशासन विभाग |
| २. | श्रीमती चारुशीला सोहोनी | दि. १६/११/२००२ ते ४/६/२००५ | प्रधान सचिव (पर्सनल) सामान्य प्रशासन विभाग |
| ३. | श्री. नविन कुमार | दि.१६/६/२००५ ते ३१/८/२००६ | अप्पर मुख्य सचिव (पर्सनल) सामान्य |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | प्रशासन विभाग |

महाराष्ट्र शासनाचे मुख्य सचिव पदांवर दिनांक १/१०/२००२ पासून कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांची नांवे.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव | कालावधी |
|---|---|---|
| १. | श्री. अजित मु. निंबाळकर (तीन महिने मुदतवाढ) | दि.१/१०/२००२ ते ३१/५/२००४ |
| २. | श्री. अरुणकुमार मागो (१ महिना मुदतवाढ) | दि.१/६/२००४ ते ३०/१०/२००४ |
| ३. | श्री. नवीन कुमार (अतिरिक्त कार्यभार) | ३१/१०/२००४ ते ८/१२/२००४ |
| ४. | श्री. आर.एम.प्रेमकुमार (३+३ महिने मुदतवाढ) | दि.८/१२/२००४ ते २८/०२/२००६ |
| ५. | श्री.डी.के. शंकरन | दि.१/३/२००६ ते ३०/४/२००७ |
| ६. | श्री. जॉनी जोसेफ | दि.३०/४/२००७ पासून |

दिनांक १/१/२००२ ते ३१/१२/२००६ पर्यंत महाराष्ट्र चित्रपट व रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक व सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव / प्रधान सचिव

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव | कालावधी | पदाचे नाव |
|---|---|---|---|
| १. | श्री. गोविंद स्वरुप | दि.१४/१२/१९९९ ते २९/११/२००२ | प्रधान सचिव, (सांस्कृतिक कार्य विभाग आणि व्यवस्थापकीय संचालक, चित्रपट व रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळ |
| २. | श्री. चिंतामणी शाम संगितराव | दि.१७/१/२००३ ते ३१/७/२००३ | व्यवस्थापकीय संचालक, चित्रपट व रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळ |
| ३. | श्री. चिंतामणी शाम संगितराव | दि.१/८/२००३ ते १५/९/२००३ | व्यवस्थापकीय संचालक, चित्रपट व रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळ |
| ४. | श्रीमती संजिवनी कुट्टी | दि. १८/९/२००३ ते ३/३/२००५ | सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग व व्यवस्थापकीय |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | संचालक, चित्रपट व रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | डॉ. राजकुमार झुस्ती | दि. २४/०५/२००५ ते ३१/१/२००६ | व्यवस्थापकीय संचालक, चित्रपट व रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळ |
| ६. | श्रीमती संजिवनी कुट्टी | दि.३१/१/२००६ ते ८/२/२००६ | व्यवस्थापकीय संचालक, चित्रपट व रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळ |

## २.५ अभिप्राय व शिफारशी :-

याप्रकरणी समितीला मिळालेल्या महितीवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी करार चित्रपट महामंडळ व सेट यांच्यात करण्यात आलेला होता. परंतु त्यास संचालक मंडळाची मान्यता घेण्यात आली नव्हती. "हम एक है" या नावाने जे दुसरे खाते बँकेत सुरु करण्यात आले होते. त्या खात्यात देय रक्कम जमा करावी अशी हस्तलिखित दुरुस्ती समाविष्ट करण्यात आली होती. त्यानुसार तीन कोटी रुपये त्या खात्यात जमा करण्यात आले ती रक्कम मॉन्टेजच्या मालकाने रोख व धनादेशाद्वारे खात्यातून काढून घेतली. करारात ठरल्यानुसार "सुपरस्टार धमाका" या कार्यक्रमाच्या १३ भागांची (एपिसोड) निर्मीती करण्याऐवजी कंपनीने फक्त एका भागाची निर्मीती केली. उर्वरित भागांच्या निर्मीतीसाठी तीन कोटींच्या तीन हप्त्यामध्ये असे एकूण ९ कोटीचे वित्तीय सहाय्य मिळविण्यासाठी कंपनीने गार्नेट पेपर मिल्स मर्या. बरोबर करार केला होता. महामंडळाला प्रत्येक ३ कोटी रुपयावर रु.३५ लाख एवढा सेवा आकार मिळावयाचा होता. गार्नेट पेपर मिल्स कडून रुपये १.५० कोटीचा धनादेश कंपनीच्या नावाने मिळाला. कंपनीने (महामंडळाने) तो धनादेश स्वत:च्या खात्यात जमा करण्याऐवजी "हम एक है" च्या खात्यात जमा केला. परिणामी, ही रक्कमही श्री. शाहब अहमद यांनी खात्यातून काढून घेतली. या सर्व बाबी आक्षेपार्ह होत्या. उर्वरित

१२ भागांची निर्मिती न केल्याने कंपनीला सेट व गार्नेट पेपर मिल्स यांना रु.४.५० कोटी परत करण्याचे दायित्व स्वीकारावे लागले. शिवाय गार्नेट पेपर मिल्स यांना १७.५० लाख रुपयाचा सेवा आकारही दयावा लागला. ही सर्व परिस्थिती सत्य असल्याचे शासनाने व महामंडळाने कबूल केले आहे.

सेट इंडिया म्हणजे सोनी टी.व्ही. चॅनेल यांनी "सुपर धमाका" या कार्यक्रमाची १३ भागांची निर्मिती महामंडळ आणि मोंटाज कंपनीने तयार करुन दयावयाचे होते व सोनी टी.व्ही.ने ते प्रसारित करावयाचे होते. यासाठी अग्रीम रक्कम म्हणून सेटने ३ कोटी रुपये चित्रनगरी महामंडळाला दिले होते. परंतु ही रक्कम "हम एक है" या शाहब अहमद यांच्या खात्यात जमा करण्यात आली. १३ भागांपैकी फक्त १ भागाची निर्मिती करण्यात आली व ती सुध्दा सदोषरित्या. त्यामुळे सेट इंडिया ही महामंडळाच्या विरोधात लवादामध्ये गेली. वास्तविक या कराराबाबत संचालक मंडळाला अजिबात कल्पना देण्यात आली नव्हती. तसेच मिळालेली रक्कम शाहब अहमद यांच्या खात्यात जमा करण्यात आली होती. त्यामुळे व्यवस्थापकीय संचालकांनी हा प्रकार मनमानीपणे, बेकायदेशीर व स्वतःच्या अधिकारात केलेला होता, यात शंका नाही. महामंडळाची रक्कम खाजगी व्यक्तीच्या खात्यात जमा करणे म्हणजे संगनमताने महामंडळाच्या रकमेची लुटालूट केली हे उघड आहे. गार्नेट पेपर मिल्सची रक्कम ही अशाच प्रकारे शाहब अहमद यांच्या खात्यात जमा करण्यात आलेली आहे. त्यामुळे महामंडळावर रकमेचा बोझा वाढत गेला. नंतर संचालक मंडळाने हे करार रद्द केले. तरी महामंडळाचे प्रचंड स्वरुपात नुकसान झालेले आहे आणि हे नुकसान जाणून बूजून व महामंडळाला तोटयात घालण्यासाठीच करण्यात आले असे समितीचे मत आहे. याप्रकरणी प्रथम आर्थिक गुन्हे शाखेकडे तक्रार करण्यात आली होती. त्यांनी सुचविल्याप्रमाणे नंतर लाचलुचपत प्रतिबंधक शाखेकडे प्रकरण सोपविण्यात आले. परंतु याच्या चौकशीमध्ये खूपच वेळ गेला. जरी एसीबीने कसून चौकशी केलेली असली तरी त्यामध्ये विलंब लागला व श्री. गोविंद स्वरुप ऑगस्ट, २००६ मध्ये सेवानिवृत्त झालेसुध्दा. एसीबीने नंतर फेब्रुवारी, २००७ मध्ये श्री. स्वरुप यांना अटक केली. परंतु ते २५ लाख रुपयांच्या जामीनावर सुटले आहेत.

सध्या प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. शासनास २००४ मध्ये अहवाल सादर होऊनही चौकशी पूर्ण होण्यास २००७ साल उजाडले. म्हणून या प्रकरणी मुद्दाम वेळ काढूपणा झालेला आहे. यात कसलीही शंका नाही. सर्व संबंधित विभागांनी व अधिकाऱ्यांनी गोविंद स्वरुप यांना याप्रकरणी पूर्णपणे वाचविण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे हे सर्व विभागीय अधिकारी यासाठी जबाबदार आहेत.

याप्रकरणी चौकशी करण्यासाठी मार्च, २००४ मध्ये एसीबीला आदेश देण्यात आले होते. त्यानुसार एसीबीने दिनांक ३१ जुलै, २००४ रोजीच गुन्हा दाखल केला व पुढे कारवाई सुरु केली. वास्तविक या प्रकरणाची सुरुवात १९९९ मध्ये झाली होती. याची विभागीय चौकशी करण्यासाठी एका समितीने चौकशीसाठी खूप विलंब लावला. म्हणून आरोपपत्र दाखल करण्यासाठी पाच वर्षाचा विलंब लागला म्हणण्यापेक्षा मुद्दामहून विलंब लावण्यात आला असेच समितीचे मत आहे. मात्र विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रकरण निपटून नेण्यासाठी समितीसमोर थातूरमातूर कारणे सांगून वेळ मारुन नेली. याप्रकरणी सत्य परिस्थिती सांगणे, झालेल्या चुकांची पूर्णपणे कबूली देणे असे अजिबात झालेले नाही. एसीबीकडून गृहविभागाकडे सदर प्रकरण डिसेंबर, २००५ मध्ये आले होते. याच दोषी व्यक्तींवर केस दाखल करण्यासाठी मार्च, २००६ रोजी सा.प्र.विभागास कळविले होते. तथापि, परवानगी किती दिवसात दयावी याची नियमात निश्चित तरतूद नाही असे अप्पर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांनी सांगितले परवानगी देण्यास विलंब लावण्यात आला हेच खरे कारण आहे. त्यामुळे गोविंद स्वरुप यांना वाचविण्याचा प्रयत्न सर्वच विभागाच्या अधिकारी यांनी हेतूपुरस्सर केला, हे सिध्द होण्यासाठी वेगळया पुराव्याची गरज नाही.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अपर महासंचालक यांनी याप्रकरणी मात्र समितीला सर्व सत्य माहिती दिली आणि केलेल्या कारवाईबाबत व्यवस्थित खुलासाही केला. त्यानुसार "हम एक है" कार्यक्रमासाठी श्री. शाहब अहमद यांनाच सर्व तोटा सहन करावा लागला असता. परंतु महामंडळाने तो स्वत:वर लादून घेतला व श्री. शाहब अहमद यांना वाचविले. तोटयाची रक्कम ६ कोटी रु. आहे. तसेच इंटर ड्रिंक्स कंपनीबरोबर केलेल्या करारातही १२ लाख ५० हजार रु., निलमुद्रा

कंपनीबरोबर १ कोटी ७० लाख रु. तोटा झाला. तिन अधिकाऱ्यावर खटला दाखल केला आहे. परंतु यामध्ये झालेल्या नुकसानीची रक्कम वसूल होण्यासाठी उपाय केला पाहिजे. अन्यथा, इतर अधिकारीही याच मार्गाचा अवलंब करतील व शासनाला भूर्दंड सोसावा लागेल. समितीच्या या मताशी पूर्णपणे सहमती दर्शवून त्यांनी अधिक स्पष्ट खुलासा केला की, **"ज्यांनी गैरव्यवहार केलेला आहे त्यांची मालमत्ता जप्त करण्याबाबतचा निर्णय शासनाने घ्यावयाचा आहे." मात्र याबाबत कोणत्याही विभागांच्या सचिवांनी / प्रधान सचिवांनी समितीस अशी माहिती दिली नाही. तसेच शासन जर असा निर्णय घेणार असेल तर विभागांनी यापूर्वीच असा निर्णय घ्यावयास हवा होता. परंतु त्यांनी समितीला पूर्णपणे अंधारात ठेवण्याचा व गोविंद स्वरुप यांना वाचविण्याचाच प्रयत्न केला हे उघड आहे. त्यानंतर गोविंद स्वरुप यांनी** बेकायदेशीरपणे केलेल्या सर्वच गोष्टींचा पाढा समितीसमोर वाचला. अगदी शासनासमोर त्यांच्या प्रकरणांचा प्रस्ताव प्रलंबित असतानाही त्यांनी १ कोटी २० लाख व १ कोटी ९५ लाख रु. मान्य करुन घेतल्याचे सांगितले आणि हा सर्व पैसा खाजगी कंपनीला देण्यात आल्याने महामंडळास तोटा सहन करावा लागला. एकंदरीत सर्वच गोष्टी गोविंद स्वरुप यांनी बेकायदेशीर केल्याने ही प्रकरणे घडल्याचे अप्पर महासंचालकांनी समितीला सांगितले.

साक्षीच्या वेळी सामान्य प्रशासन विभागाच्या अप्पर मुख्य सचिवांनी समितीला माहिती दिली की, अधिकाऱ्यांच्या वर्तणूकीमुळे जर शासनाचा किंवा त्याच्या संस्थांचा तोटा झाला असेल, तर तो तोटा भरुन काढण्यासाठी कायद्याप्रमाणे कार्यवाही करावी लागते. तसेच या प्रकरणी जो गैरव्यवहार झालेला आहे तो अगदी जाणुनबुजून झालेला आहे याची सुध्दा दखल सामान्य प्रशासन विभागाने घेतली आहे. यामध्ये कोटयावधी रुपयांची अफरातफर झालेली आहे हे शासनाच्या लक्षात आले आहे. जरी त्यांनी वरीलप्रमाणे माहिती दिली तरीही श्री. गोविंद स्वरुप यांच्यावर गुन्हा दाखल करण्यासाठी मात्र फारच विलंबाने परवानगी का दिली, अप्पर महासंचालकांनी सांगितल्याप्रमाणे रक्कम वसूल करण्यासाठी शासनाने निर्णय घ्यावयाचा आहे असे असताना तसा निर्णय घेऊन त्याची कार्यवाही करण्यासाठी त्यांना का कळविले नाही,

पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंद करण्यासाठी समितीने आग्रह धरला असतानाही गोष्ट का कबूल करण्यात आली नाही, एसीबीच्या चौकशीला फारच विलंब लागतो हे माहित असताना त्यांच्याकडेच का चौकशी सोपविण्यात आली या सर्व प्रश्नांची उत्तरे देण्याची त्यांनी टाळाटाळ का केली.

वरील सर्व परिस्थिती विचारात घेता, श्री. गोविंद स्वरुप यांनी निरनिराळ्या मार्गाने अनेक प्रकरणात महामंडळाचे फार मोठ्या प्रमाणात नुकसान केलेले आहे हे आता बहुतेक शासनाच्या, पोलीस खात्याच्या लक्षात आले आहे. एसीबीच्या चौकशीतही ते दोषी ठरले आहेत. त्यानुसार त्यांच्यावर सद्या खटला भरण्यात आलेला आहे व प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. परंतु त्यांनी गैरमार्गाने जे कोट्यावधी रुपये हडप केले आहेत त्यांची वसूली मात्र सद्याच्या खटल्यातून होणार नाही अशी माहिती साक्षीच्यावेळी समितीसमोर आलेली आहे. वास्तविक अप्पर महासंचालकांनी सांगितल्यानुसार ही रक्कम वसूल करण्यासाठी शासनाने निर्णय घ्यावयाचा आहे. अर्थात अद्यापही असा निर्णय घेण्यात आलेला नाही. समितीने काढलेल्या निष्कर्षानुसार झालेला गैरव्यवहार किमान ८० कोटी रुपयापर्यंत जात आहे. **म्हणून समिती अशी आग्रहाची शिफारस करीत आहे की, श्री. गोविंद स्वरुप यांनी केलेल्या गैरव्यवहाराच्या सर्व रकमेची वसूली करण्यासाठी शासनाने विनाविलंब निर्णय घ्यावा व त्यानुसार कारवाई सुरु करावी. तसेच आवश्यकता भासल्यास सध्याच्या न्यायप्रविष्ट प्रकरणात तशी सुधारणा करण्यात यावी व ते शक्य नसल्यास रक्कम वसूलीसाठी स्वतंत्र खटला दाखल करण्यात यावा. ही कारवाई विनाविलंब करण्यात यावी. एवढेच नव्हे तरसांस्कृतिक कार्य विभाग, गृह विभाग, सामान्य प्रशासन विभागातील ज्या अधिकाऱ्यांनी आपल्या कामात कुचराई करुन या प्रकरणात श्री. गोविंद स्वरुप यांना प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष मदत केली आहे आणि सध्या जे सेवेत आहेत त्यांच्यावरती कडक कारवाई करण्यात यावी म्हणजे भविष्यात अशा प्रकारे आरोपींना सहाय्य करणारे कोणीही धजावणार नाही अशी समितीची धारणा आहे. त्याशिवाय जे अधिकारी सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांच्यावरही कारवाई करण्यात यावी ही सर्व कार्यवाही एक महिन्यात पूर्ण करावी व त्याचा अहवाल एक महिन्यात पाठविण्यात यावा.**

सदर प्रकरणाची नस्ती मुख्य सचिवांकडे जून, २००३ ते मार्च २००४ अशी नऊ महिने पडून होती. त्यावर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. वास्तविक महामंडळाने हे प्रकरण दिनांक १०/४/२००३ रोजी कारवाई आर्थीक गुन्हे शाखेकडे पाठविले. त्यांनी गुन्ह्याच्या चौकशीअंती असा निष्कर्ष काढला की हे प्रकरण लाचलुचपत विभागाकडे पाठवण्यात यावे. त्याप्रमाणे तसा अहवाल गृह विभागाकडे पाठविण्यात आला. सदर अहवाल जून, २००३ मध्ये मुख्य सचिवांकडे पाठविण्यात आला. तथापि, तो मार्च २००४ पर्यंत ९ महिने त्यांच्याकडे पडून होता. त्यानंतर मार्च, २००४ मध्ये सदर प्रकरण लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे पाठविण्यात आले.

**या प्रकरणाची सर्वात महत्वाची बाब म्हणजे गैरव्यवहार झालेल्या सर्व रकमेचा तपास करुन ती वसूल करण्याच्या दृष्टीने पावले उचलणे आवश्यक आहे. अहवालात आलेल्या सर्व माहितीचा विचार करता, श्री.गोविंद स्वरुप यांनी अनेक व्यक्तिशी, संस्थाशी करार करुन अनेक बेकायदेशीर गोष्टी केलेल्या आहेत. मिळालेल्या रक्कमा खाजगी व्यक्तींच्या व संस्थांच्या खात्यात जमा केलेल्या आहेत आणि महामंडळाला तोटयात आणलेले आहे. तेव्हा अशा सर्व खाजगी व्यक्ती व संस्था त्यांच्यावरही धाडी टाकून त्यांच्या मालमत्तेची चौकशी करुन सर्वांना ताब्यात घ्यावे, गैरव्यवहाराच्या रक्कमा या करोडो रुपयामध्ये आहेत. यासाठी पोलीस खात्यात एक स्वतंत्र सेल उघडण्यात यावा आणि कडक कारवाई सुरु करण्यात यावी. शासनाने यासाठी गैरव्यवहाराची सर्व रक्कम वसूल करण्याचा त्वरीत निर्णय घेऊन १५ दिवसात पोलीसांना तसे कळवावे. श्री.गोविंद स्वरुप, शाहब अहमद श्री.अ.ग.शूक्ल यांच्याकडमन रक्कमा वसूल करण्यात याव्यात. या प्रकरणी करण्यात येत असलेल्या कारवाईच्या सद्यस्थितीचा अहवाल दर दोन महिन्यांनी समितीला सादर करावा आणि कारवाई पूर्ण झाल्यानंतर संपूर्ण प्रकरणाचा अहवाल समितीला सादर करावा अशीही समितीची शिफारस आहे.**

## तीन : "कामाची पूर्तता न करणे निधी इतरत्र वळविल्यामुळे महसूल निर्मिती करणाऱ्या मतांचे बांधकाम अपूर्ण राहिले होते"

३.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००४-२००५ च्या (वाणिज्यिक) अहवालातील परिच्छेद क्रमांक ४.३ मध्ये **"कामाची पूर्तता न करणे निधी इतरत्र वळविल्यामुळे महसूल निर्मिती करणाऱ्या मतांचे बांधकाम अपूर्ण राहिले होते"** या संबंधात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले की,

महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित (कंपनी) ने तीन कलागारे व एक संचार केंद्र उभारण्यास रुपये १५.०९ कोटीचे कंत्राट नॅशनल (इंडिया) कॉन्ट्रॅक्टर्स व इंजिनियर्स यांना प्रदान (मे-जून २००२) केले होते. कलागारे बांधणयसाठी व कर्जाची रक्कम रोख्याद्वारे उभारली (२०००-०१) होती. कंपनीने या कारणासाठी निधीचा पूर्णपणे उपयोग केला नाही. रुपये ६.१७ कोटी किंमतीचेच काम फक्त पुर्ण झाले होते. या उभारलेल्या निधीमधून रुपये ६.३९ कोटी किंमतीच्या ठेवी ज्या या कराराव्यतिरिक्त इतर करारासाठीच्या कंत्राटदारासाठी सुरक्षा ठेव म्ळणून गहाण ठेवल्या होत्या त्या बुडाल्या होत्या व ते पैसे या बांधकामासाठी उपलब्ध झाले नाहीत. अशारितीने काम अपूर्ण राहिले (जुलै २००५) होते व अपूर्ण राहिलेल्या मतांवर (रुपये ६.१७ कोटी) काढण्यात आलेले व्याज रुपये १.५९ कोटी (जुलै २००५) होते. कंपनीनेआपल्या उत्तरात (जून २००५) ज्यास शासनाने सहमती दर्शविली होती. म्हटले (जुलै २००५) होते की शासनाने ना हरकत प्रमाणपत्र मिळाल्यानंतर हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी बँकांमार्फत निधी उभारण्याचे प्रयत्न करण्यात येत होते. परंतू हे तथ्य तसेच शिल्लक राहते की, प्रकल्पासाठी असलेला निधी इतरत्र वळविल्यामुळे बांधकाम अद्याप (ऑगस्ट, २००५) अपूर्णच राहिले होते.

३.२ या प्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करतांना असे नमूद केले की, परिच्छेदामध्ये नमूद केलेली माहिती सत्य आहे. महामंडळाने रुपये २० कोटी कर्जरोख्यांद्वारे उभारले होते. त्यापैकी रुपये ५.४५ कोटी

इतकी रक्कम इंडियन ओवरसीज बँकेचे कर्ज परतफेड करण्यासाठी वापरण्यात आली. उर्वरीत रक्कम विकासकामे करण्यासाठी उपयोगात आणावयाची होती. परंतू त्यापैकी काही रक्कम म्हणजेच रु.६.३९ कोटी "हम एकहै" या कार्यक्रमासाठी अनियमितरित्य वापरण्यात आली. महामंडळाने याबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे बँक ऑफ महाराष्ट्र विरुध्द एकूण रक्कम रुपये ९.४० कोटी व्याजासह वसूलीसाठी दिवाणी दावा (क्र.१३१९/२००५) दाखल केला आहे. महामंडळाने ३१/०३/२००६ पर्यंत चार मोठ्या प्रकल्पावर रुपये ६.९८ कोटी खर्च केलेले आहेत. महामंडळाने संचालक मंडळाच्या ८३ व्या बैठकीत ठराव क्र.८३/७ नुसार महामंडळाकडे पुरेसा निधी उपलब्ध होत नसल्यामुळे स्टुडिओ टाईप viii आणि ix चे बांधकाम करण्याचे कंत्राट रद्द करण्यात यावे असे ठरले. तद्‌नंतर संचालक मंडळाच्या ८८ व्या बैठकीत हे प्रकल्प BOT तत्वावर पूर्ण करण्यात यावेत असे ठरले. पुढे असेही पारित करण्यात आले की, सुरुवातीपासून स्टुडिओ टाईप VII आणि कम्यनिकेशन सेंटरचे बांधकाम प्रगतीपथावर असल्याने दोन्ही प्रकल्प पूर्ण करण्यासाठी अंदाजे रक्कम रुपये १६ कोटीची गरज असून त्याकरीता बँकेकडून कर्ज उभारुन सदरचे प्रकल्प पूर्ण करण्यात यावे. तसेच संचालक मंडळाच्या ८४ व्या बैठकीत महामंडळाचे ताब्यात असलेली जमीन शासनाचे मालकीची असल्यामुळे व ती कर्ज मंजूर होणेसाठी तारण ठेवणे आवश्यक असल्यामुळे बँकेकडून कर्ज उभारण्यासाठी शासनाकडून ना हरकत प्रमाणपत्र मिळविणे गरजेचे आहे असे ठरले होते. तथापी, सद्य परिस्थितीत महामंडळाचे ताब्यात असलेली जमीन तारण ठेवण्यासाठी शासनाकडून ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त न झाल्यामुळे आणि त्यामुळे बँकेकडून कर्ज उपलब्ध होऊ न शकल्यामुळे व अपूर्ण राहिलेले प्रकल्प पूर्ण करणे गरजेचे असल्यामुळे महामंडळाच्या संचालक मंडळाचे ९८ व्या बैठकीतील ठरावानुसार सदरप्रकल्प "बांधा, वापरा व हस्तांतरीत करा तत्वावर पूर्ण करण्याचे ठरविण्यात आले आहे." त्यानुसार वरील चारही अपूर्ण प्रकल्प "बांधा, वापरा व हस्तांतरीत करा" तत्वावर पूर्ण करण्यासाठी नामांकीत संस्थांकडून प्रस्ताव मागवून संस्था निवडीची प्रक्रीया सुरु करण्यात आलेली आहे.

३.३ महामंडळाच्या वरील अभिप्रायाशी शासनाने खालील प्रमाणे मत व्यक्त केले आहेत. महामंडळाकडून आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

३.४ या प्रकरणी समितीने महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक आणि पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव यांची १५ व २२ मे, ६ व १९ जून, २००७ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी, व्यवस्थापकीय संचालकांनी या संदर्भात अशी माहिती दिली की, त्यावेळी शासनाच्या हमीने रु. २० /- कोटीचे बॉंड खरेदी केले होते. चित्रनगरीमध्ये स्टूडिओची संख्या कमी होती. ते स्टूडिओ बांधण्यासाठी महामंडळाने २० कोटी रुपये कर्जरोख्याद्वारे उभारले होते. यापैकी रु. ५.४५ कोटी हे जुने कर्ज परतफेड करण्यासाठी वापरले. उर्वरित रक्कम विकासकामांसाठी वापरावयाची होती. त्यापैकी रक्कम रु. ६.३९ कोटी "हम एक है" कार्यक्रमासाठी वापरण्यात आली. तर उर्वरित रकमेतून ४ स्टूडिओ व एका कम्युनिकेशन सेंटरचे काम हाती घेण्यात आले होते. परंतु सदर कामे महामंडळाच्या स्तरावर अपूर्णावस्थेत आहेत. ती पूर्ण करण्यासाठी रु. २० ते ३० कोटी इतका निधी लागणार आहे. आता सदर काम बांधा,वापरा व हस्तांतरीत करा तत्वावर पूर्ण करण्यासाठी नामांकित संस्थाकडून प्रस्ताव मागवून संस्था निवडीची प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे. त्यावेळी श्री. गोविंद स्वरुप हे व्यवस्थापकीय संचालक होते व सदर कार्यक्रमाचे हक्क झी टीव्ही या खाजगी वाहिनीला विकण्यात आले होते. व्यवस्थापकीय संचालकांना बॅंकेत खाते उघडण्याचे अधिकार संचालक मंडळाने पूर्वीच प्रदान केले होते. त्यानुसार या अधिकाराचा गैरवापर करुन त्यांनी बॅंकेत नविन खाते उघडलेले होते. तथापि,मध्यंतरी संचालक मंडळाने महाअभिभोक्ता श्री. गुलाम वाहनवही यांचा अभिप्राय मागविला होता, खाते उघडण्यासाठी आणि बंद करण्यासाठी महामंडळाने व्यवस्थापकीय संचालकांना अधिकार दिलेला आहे. हा अधिकार वापरताना योग्य तो संकेत पाळणे आवश्यक आहे असा अभिप्राय त्यांनी दिला होता. श्री गोविंद स्वरुप यांचा मालम-ता जप्त करण्याबाबत न्यायालयास विनंती केली आहे काय ? या समितीच्या प्रश्नास उत्तर देण्यात आले की, लाच लूचपत प्रतिबंधक विभागाने कारवाई सुरु केलेली असून महामंडळ त्यांच्या संपर्कात आहे. पूर्ण प्रकरण त्यांच्याकडे आहे. **या घडलेल्या**

**प्रकणांमध्ये पैसे वसूल करता येतील काय याबाबत समितीने विचारणा केली असता अप्पर महासंचालकांनी माहिती दिली की,आर्थिक गैरव्यवहाराच्या प्रकरणात संबंधितांची मालमत्ता जप्त करण्याची कायद्यात तरतूद नाही.सामान्य प्रशासन विभागाच्या अप्पर मुख्य सचिव श्रीमती चित्कला झुत्सी यांनीही अप्पर महासंचालकाच्या मताला दुजोरा देऊन सहमती दर्शविली आहे.** याबाबत संबंधिताची मालमत्ता जप्त करता येत नाही असे असेल तर कायद्यामध्ये सुधारणा करण्याची गरज आहे. अधिकाऱ्यांनी जनतेचा पैसा लूटून न्यावा आणि भावी पिढयांचा फायदा करावा. मात्र अशावेळी त्यांची मालमत्ता जप्त करता येत नसेल तर ही कायद्यातील उणिव दूर करण्याची व सुधारणा करण्याची गरज असल्याचे मत समितीने प्रतिपादन केले.

महामंडळाला कोणकोणत्या कारणासाठी कर्जासाठी हमी दिली जाते व अर्थसंकल्पातून दिलेले पैसे नेमके कोणत्या कारणासाठी खर्च केले जातात हे स्पष्ट होत नाही. शासनाकडून दिलेल्या पैशाचा उपयोग योग्य प्रकारे झालेला आहे की,नाही हे तपासण्याची जबाबदारी कोणाची आहे यावर वित्त विभागाच्या प्रधानसचिवानी मान्य केले की,हे तपासण्याची जबाबदारी वित्त विभागाची आहे. शिवाय हेही कबूल केले की,जे २० कोटी रुपयांचे रोखे काढले होते त्याच्या खर्चासाठी महामंडळास वित्त विभागाने हमी दिलेली आहे. मात्र याविषयीची प्रमुख जबाबदारी महामंडळाची आहे आणि दुय्यम जबाबदारी वित्त विभागाची आहे.त्यांनी याबाबत अडचण सांगितली की,६०-७० महामंडळाच्या खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी केवळ ४-५ लोकांचा कर्मचारी वर्ग असल्याने अशा अनियमितता वेळीच लक्षात येत नाहीत. तथापि, या स्टाफमध्ये वाढ करण्याची बाब विचाराधीन असल्याचेही त्यांनी सांगितले.असे प्रस्ताव वित्त विभागाकडे डायरेक्ट न येता संबंधित विभागाकडून येतात. या प्रकरणात या रोखे उभारणीसाठी सांस्कृतिक कार्य विभागाने  सहमती दिलेली असल्यामुळे त्यास वित्त विभागाने मान्यता दिली. ज्या कामासाठी हा निधी देण्यात आला होता त्याच कामासाठी तो न वापरणे हाही एक प्रकारे गुन्हा आहे. ही बाब वित्त विभागाच्या लक्षात येणे आवश्यक होते. परंतु ते लक्षात आले नाही हे त्यांनी मान्य केले.

सांस्कृतिक कार्य विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकानी तथा सांस्कृतिक कार्य विभागाच्या सचिवानी या प्रकरणासंबंधी माहिती दिली की,या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी संचालक मडळाने तीन-सदस्य समिती नेमली होती. या समितीने दि. ९/४/२००३ रोजी अहवाल दिल्यानंतर संचालक मंडळाने फौजदारी कारवाई करण्याचा निर्णय घेतला. त्याप्रमाणे गुन्हे शाखेकडे तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक श्री. गोविंद स्वरुप यांच्या विरोधात गुन्हा नोंदविण्यात आला. त्यावेळी श्री. संगीतराव हे व्यवस्थापकीय संचालक होते. दि. १०-४-२००३ रोजी प्रकरण आर्थिक गुन्हे शाखेकडे कागदपत्रासह पाठविण्यात आले होते. त्यांनी या गुन्हयाच्या चौकशी अंती असा निष्कर्ष काढला की,हे प्रकरण लाचलूचपत प्रतिबंधक विभागाकडे पाठविण्यात यावे. त्यानुसार लाचलूचपत प्रतिबंधक विभाग आता हे काम पहात आहे.

## ३.५ अभिप्राय व शिफारशी

या प्रकरणी समितीला मिळालेली लेखी माहिती व साक्षीच्या वेळी मिळालेली माहिती याचा बारकाईने विचार करता, लेखा आक्षेपात आलेली माहिती सत्य असल्याचे महामंडळाने मान्य केले आहे व शासनाने त्यास दुजोरा दिलेला आहे.

महाराष्ट्र चित्रपट, रंगभुमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाने तीन कलागारे व एक संचार व केंद्र नव्याने उभारण्यासाठी रु.१५.०९ कोटीचे कंत्राट नॅशनल (इंडिया) कॉन्ट्रॅक्टर्स व इंजिनिअर्स यांना प्रदान केले होते. यासाठी रु.२० कोटीची रक्कम रोख्याद्वारे उभारली होती. परंतु याच कारणासाठी निधीचा पूर्ण वापर न करता केवळ रु.६.१७ कोटी किंमतीचेच काम पूर्ण केले होते. उर्वरीत रकमेपैकी रु.५.४५ कोटी रक्कम इंडियन ओव्हरसीज बँकेचे कर्ज परतफेड करण्यासाठी वापरण्यात आली. तसेच रु. ६.३९ कोटी " हम एक है" या कार्यक्रमासाठी अनियमितरित्या वापरण्यात आली. अशा रितीने निधी खर्च झाल्यानंतर पुरेसा निधी उपलब्ध न राहिल्याने तीन कलागरे (स्टुडिओ) (व एका संचार केंद्राचे) बांधण्याचे देण्यात आलेले कंत्राट रद्द करण्यात आले.एका स्टुडिओचे व संचार केंद्राचे काम प्रगतीपथावर असल्याने ते पूर्ण करावे असे ठरले. परंतु त्यासाठी अंदाजे रुपये १६ कोटी रकमेची गरज असल्याने बँकेकडून कर्ज उभारुन हे प्रकल्प पूर्ण करण्यात यावे असे ठरले होते. परंतु महामंडळाकडे ताब्यात असलेली जमीन शासनाच्या मालकीची असल्याने व शासनाने त्यावर कर्ज काढण्यासाठी "ना हरकत प्रमाणत्र" न दिल्याने कर्ज काढता आले नाही.

त्यामुळे अपूर्ण राहिलेले प्रकल्प पूर्ण करण्यासाठी "बांधा, वापरा व हस्तांतरीत करा" या तत्वार पूर्ण करण्याचे महामंडळाने ठरविले. त्यानुसार सदर प्रकल्प पूर्ण करण्यासाठी नामांकित संस्थाकडून प्रस्ताव मागवून प्रस्ताव निवडीची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.

वरील सर्व परिस्थिती विचारात घेता, ज्या कामांसाठी २० कोटी रुपयांचे कर्ज रोखे उभारले होती ती रक्कम त्या कामांसाठी न वापरता इतर कामांसाठीच वापरण्यात आली व कलागारे आणि संचार केंद्राचे काम तसेच अपूर्णावस्थेत राहिले त्यातल्या त्यात समाधानाची बाब एवढीच की, रु.५.४५ कोटी रक्कम इंडियन ओव्हरसीज बँकेचे कर्ज परतफेड करण्यासाठी वापरण्यात आली. म्हणजे एक बोझा महामंडळाचा कमी झाला होता. परंतु हे कर्ज कशासाठी काढण्यात आले होते ते स्पष्ट झालेले नाही. व्यवस्थापकीय संचालकांनी श्री. गोविंद स्वरुप यानी या महामंडळामध्ये फार मोठया प्रमाणात गोलमाल करुन मनमानीपणे व बेकायदेशीर सर्व व्यवहार केलेले दिसून येतात. रोख्याद्वारे उभारलेल्या रु.२०/- कोटीपैकी रु.६.३९ कोटी रक्कम "हम एक है" या कार्यक्रमासाठी पूर्णपणे बेकायदेशीररित्या वापरण्यात आली. वास्ताविक हा कार्यक्रमही पूर्ण झाला नाहीच व रक्कमही खाजगी संस्थेच्या मालकाच्या ताब्यात गेली म्हणजे जाणीवपूर्वक गायब करण्यात आली असे समितीचे स्पष्ट मत आहे. अशाप्रकारे फार मोठया रकमेचा अपहार करण्यात आलेला आहे. कारण रक्कम अपहाराचे हे एकच प्रकरण नाही. अशी अपहाराची किमान १०-१२ प्रकरणे आहेत व सुमारे ८० कोटी रुपयांपर्यंत ही अपहाराची रक्कम जाते.

साक्षीच्या वेळी अप्पर महासंचालक, लाचलूचपत प्रतिबंधक विभाग यांनी असे स्पष्ट केले आहेकी, **आर्थिक गैरव्यवहाराच्या प्रकरणांत संबंधीतांची मालमत्ता जप्त करण्याची कायद्यात तरतूद नाही फार तर आरोपींना न्यायालय तुरुंगाची शिक्षा देते वा किरकोळ स्वरुपात दंड करते मात्र संपूर्ण अपहाराची रक्कम वसूल होणे शक्य नाही. श्री. पारसनीस यांच्या या मताला सामान्य प्रशासन विभागाच्या अप्पर मुख्य सचिव श्रीमती. चित्कला झुत्सी यांनीही साक्षीच्या वेळी दुजोरा दिला.**

महामंडळाना ज्या कारणांसाठी कर्ज काढण्यासाठी हमी दिली जाते व अर्थसंकल्पातून दिलेले पैसे नेमके कोणत्या कारणासाठी खर्च केले जातात त्या पैशाचा उपयोग योग्य प्रकारे झालेला आहे की नाही हे तपासण्याची जबाबदारी वित्त विभागाची आहे हे वित्त विभागाच्या प्रधान सचिवांनी साक्षीच्या वेळी मान्य केले आहे. शिवाय हेही कबूल केली की,रु.२० कोटी रोख्याद्वारे उभारण्यासाठी या चित्रपट व रंगभुमी

महामंडळाला वित्त विभागाने हमी दिलेली आहे. तथापि, ज्या कारणांसाठी पैसे उभारण्यास हमी दिलेली आहे त्याच कारणासाठी ही रक्कम वापरण्यात आलेली नाही ही बाब वित्त विभागाच्या लक्षात आलेली नाही. मात्र जर वेळीच ही बाब लक्षात आली असती, तर वित्त विभागाने नक्कीच कारवाई केली असती. परंतु पुढे त्यांनी अशी ही अडचण सांगितली की, राज्यातील सर्व ६०-७० महामंडळाच्या खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी वित्त विभागाकडे केवळ ४-५ लोकांचा स्टाफ आहे त्यामुळे ह्या बाबी वेळीच लक्षात येत नाहीत अर्थात यापुढे कर्मचारी वर्गात वाढ करण्याची योजना असल्याचेही त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या गैरकारभारावर समितीने यापूर्वी ८ डिंसेबर, २००६ च्या नागपूर अधिवेशनामध्ये चौथा अहवाल सादर केलेला आहे.सदर अहवालामध्ये समितीने अशी स्पष्ट शिफारस केलेली आहे की,"महामंडळाचे व शासनाचे जे नुकसान झालेले ते भरुन काढण्यासाठी शासनाने श्री. गोविंद स्वरुप व त्यांच्या नातेवाईकांची सर्व मालमत्ता न्यायालयामार्फत सील करावी आणि त्याच्याविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करुन करता येईल तेवढी कडक कारवाई करावी " त्याशिवाय त्यांच्या गैरकारभाराची व अपहाराची अन्य अनेक जी प्रकरणे आहेत त्याबाबतही साधारणपणे वरील प्रमाणे शिफारस करुन झालेल्या नुकसानीची भरपाई करण्याबाबत नमूद करण्यात आले आहे. तथापि, या अहवालाच्या शिफारशींकडे महामंडळाने वा शासनानेही गांभीर्याने लक्ष दिल्याचे दिसत नाही. अन्यथा, नुकसानीची भरपाई करण्याच्या दृष्टीने अन्य निरनिराळ्या कायद्यांखाली त्यांच्यावर वेगळी केस भरण्यात आली असती असे समितीचे मत झाले आहे. वास्तविक हा अहवाल शासनाला व महामंडळाला प्राप्त होऊन सहा महिन्याचा कालावधी लोटला आहे. परंतु अद्याप त्यावर का कारवाई करण्यात आली नाही वा त्या संबंधात कोणा उच्च पातळीवरील व्यक्तीकडून दबाव येत आहे काय अशी समितीस शंका आहे. कारण झालेल्या रकमेचा अपहार एवढ्या मोठ्या प्रमाणात होऊनही जर कोणी श्री.गोविंद स्वरुप यांना वाचविण्याचा प्रयत्न करीत असेल तर ही अत्यंत निषेधार्थ बाब आहे यात शंका नाही. श्री.गोविंद स्वरुप यांनी केलेला अनियमितपणा, मनमानीपणा, अपहार यामुळे किमान दहा प्रकरणात झालेला खर्च

अफरातफर वा तोटा यांची समितीपुढे आलेली एकूण रक्कम रु.७८.९८ कोटी एवढी मोठी आहे. समितीच्या चौथ्या अहवालातील प्रकरणे व आता समितीपुढे झालेली प्रकरणे या सर्व प्रकारणातील ही रक्कम आहे.

समितीच्या वरील सर्व अभिप्रायाचा विचार करता प्रत्येक अभिप्रायाबाबत समिती स्वतंत्रपणे शिफारस करु इच्छिते.

आर्थिक गैरव्यवहाराच्या प्रकरणात संबंधितांची मालमत्ता जप्त करण्याची कायद्यात तरतूद नाही असे अप्पर महासंचालक, लाचलुचपत विभाग व अप्पर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय यांनी मत व्यक्त केले आहे. सध्या श्री.गोविंद स्वरुप यांच्या विरोधात जी केस भरण्यात आली आहे त्या केसच्या व कायद्याच्या स्वरुपावरुन त्यांनी हे मत व्यक्त केले असावे असे समितीचे मत आहे. वास्तविक समितीने यापूर्वी सादर केलेल्या चौथ्या अहवालातील शिफारशी विचारात घेऊन रक्कम वसूल करण्यासाठी कोणत्या कायद्याखाली वेगळी केस करावी याचा शासनाने व महामंडळाने विचार करावयास हवा होता. परंतु तसे झालेले नाही. सामान्य माणसाची चोरीला गेलेली मालमत्ता ही पोलिस चोरांकडून कायदेशीरपणे वसूल करुन मालकाला परत मिळवून देतात. हा एक सर्वसामान्य अनुभव आहे. असे असतानाही एका उच्च पदस्थ अधिकाऱ्याकडील अपहारीत मालमत्ता परत मिळवणे महामंडळाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे व आवश्यक आहे म्हणून समिती **अशी शिफारस करते की, सध्या श्री.गोविंद स्वरुप यांच्या विरोधात दाखल केलेली केस तशीच चालू द्यावी. परंतु त्यांनी अपहारीत केलेली महामंडळाची रक्कम वसूल करण्यासाठी त्यांच्या विरोधात वेगवेगळ्या कायद्याखाली स्वतंत्र वेगळा दावा दाखल करण्यात यावा. जेणेकरुन रक्कम वसूल करणे शक्य होईल. त्यादरम्यान त्यांच्या व जवळच्या नातेवाईकांच्या स्थावर व जंगम मालमत्ता तसेच बँकेतील रक्कमा, शक्य असेल ती इतर मालमत्ता सील करुन त्यांना विकता येणार नाही अशीही व्यवस्था करण्यात यावी. यासाठी त्यांच्या घरी धाडी घालून सर्व मालमत्तेची चौकशी करण्यात यावी. त्याशिवाय त्यांनी पलायन करु नये वा लपून राहू नये. यासाठी त्यांना अजामीनपात्र अशा कलमाखाली तुरुंगात डांबून ठेवण्यात यावे.**

**याप्रकरणी केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला सद्यस्थितीच्या स्वरुपात दर दोन महिन्यांनी व अंतिम निर्णय झाल्यानंतर पूर्ण स्वरुपात सादर करण्यात यावा.**

समितीने आतापर्यंत बहुतेक महामंडळांची/मंडळांची तपासणी केलेली आहे. या तपासणीदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले आहे की, जवळजवळ प्रत्येक उपक्रमामध्ये अशी वादग्रस्त प्रकरणे असून ती वेगवेगळ्या न्यायालयात चालू आहेत असे अनेक वर्षे चालते. परंतु त्याचा निर्णय काही लवकर लागत नाही. त्यामुळे सार्वजनिक उपक्रमाचे व पर्यायाने शासनाचे नुकसान होत आहे. कारण अशी प्रकरणे काही लाखापासून करोडो रुपयांच्या रक्कमेपर्यंत आहेत. एवढी मोठी रक्कम न्यायालयाचा निर्णय लागत नाही तोपर्यंत महामंडळाच्या वापरात राहत नाही. त्यावर मिळणारा नफा व व्याजही बुडते आणि महामंडळाला आवश्यक असणारे भांडवलही अडकून पडते. **महामंडळाचे होणारे नुकसान होऊ नये व अधिक कालावधीसाठी ती रक्कम अडकू नये यासाठी अशा दाव्यांचा जलद गतीने निर्णय लागावा यासाठी राज्यातील सर्वच ६०-७० सार्वजनिक उपक्रमासाठी राज्यात एक व दोन स्वतंत्र जलदगती न्यायालये स्थापन करण्यात यावीत. ही अत्यंत महत्त्वाची शिफारस असल्याने तिचा अतिशय गंभीरपणे विचार करण्यात यावा अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

वित्त विभागाकडून महामंडळांना ज्या कारणासाठी पैशाची हमी दिली जाते वा इतर मार्गाने पैसे दिले जातात ते पैसे त्याच मार्गाने त्याच कारणासाठी वापरले जातात किंवा कसे यावर वित्त विभागाचे नियंत्रण असते. परंतु प्रत्यक्षात तशी तपासणी होत नाही. कारण वित्त विभागाकडे यासाठी केवळ ४-५ अधिकारी व कर्मचारी आहेत. ६०-७० महामंडळांवर नियंत्रण ठेवणे त्यामुळे शक्य होत नाही. असे वित्त विभागाच्या प्रधान सचिवांनी कबूल केलेले आहे. हा स्टाफ वाढविण्याची योजना असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे. वास्तविक ६०-७० महामंडळांवर शासनाचे वर्षाला शेकडोच नव्हे हजारो कोटी रुपये खर्च होत असतील. परंतु ते योग्य त्याच कारणासाठी खर्च होतात किंवा नाही ते तपासण्यासाठी मात्र पुरेसा अधिकारी व कर्मचारी वर्ग नाही. **म्हणून या सर्व महामंडळांना देण्यात येणाऱ्या निधीची वेळीच तपासणी करण्यासाठी केंद्र सरकारच्या**

धर्तीवर एक स्वतंत्र सेल निर्माण करण्यात यावा. जेणेकरुन देण्यात येणारी रक्कम त्याच कारणासाठी वापरली जाते किंवा कसे यावर नियंत्रण ठेवता येईल तसेच प्रत्येक महामंडळाने दर तीन महिन्यांनी कोणत्या कारणासाठी किती रक्कम खर्च करण्यात आली याचा अहवाल या नियंत्रण सेलकडे पाठविला पाहिजे असे बंधन घालण्यात यावे. म्हणजे भ्रष्टाचार, अनियमितपणा व रक्कमांचा अपहार अशा बाबीवर अप्रत्यक्षपणे नियंत्रण ठेवता येईल. सबब, शासनाने समितीच्या या शिफारशीची अंमलबजावणी अत्यंत प्रभावीपणे करावी. याबाबत केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावा.

---

# बैठकींचे परिशिष्ट

---

**मंगळवार, दिनांक १५ मे, २००७ विधानभवन, मुंबई.**

**उपस्थिती.**

१) श्री. नाना पटोले, वि.स.स. तथा समिती प्रमुख.

**सदस्य**

२) श्री. पी.यु.मेहता, वि.स.स.
३) श्री. मदन पाटील, वि.स.स.
४) श्री. नामदेवराव पवार, वि.स.स.
५) श्री. रविंद्र गायकवाड, वि.स.स.
६) श्री. साहेबराव तट्टे, वि.स.स.
७) श्री. नारायणराव गव्हाणकर, वि.स.स.
८) श्री. विश्वनाथ डायगव्हाणे, वि.प.स.
९) श्री. सदाशिवराव पोळ, वि.प.स
१०) श्री. मधुकर सरपोतदार, वि.प.स.
११) श्री. श्रीकांत जोशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री. दि.वि.चोघले, अतिरिक्त सचिव
श्री. डी.एम.गवळी, समिती अधिकारी

**महालेखाकार (वाणिज्यिक) लेखा परिक्षा**

श्रीमती संगीता चौरे, महालेखाकार (वाणिज्यिक लेखा)
श्री. यु.बी.पाठक, वरिष्ठ लेखा परिक्षा अधिकारी (वाणिज्यिक लेखा)

**साक्षीदार**

**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.**

श्री. भूषण गगराणी, सचिव (सांस्कृतिक कार्य)

**महाराष्ट्र च्रित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ**

श्री. भूषण गगराणी, व्यवस्थापकीय संचालक, (अतिरिक्त कार्यभार)

समितीने भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००३-२००४ व २००४-०५ च्या (वाणिज्यिक) अहवालातील महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या परिच्छेदासंबंधात विभागीय सचिवांची तथा महामंडळाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली.

## मंगळवार, दिनांक २२ मे, २००७ विधानभवन, मुंबई.
## उपस्थिती.

१) श्री. नाना पटोले, वि.स.स. तथा समिती प्रमुख.

**सदस्य**

२) श्री. संजय चव्हाण, वि.स.स.
३) श्री. रमेशभाई कदम, वि.स.स.
४) श्री. चंद्रशेखर भोसले, वि.स.स.
५) श्री. पी.यु.मेहता, वि.स.स.
६) श्री. प्रतापराव चिखलीकर, वि.स.स.
७) श्री. मदन पाटील, वि.स.स.
८) श्री. दिनकर माने, वि.स.स.
९) श्री. नामदेवराव पवार, वि.स.स.
१०) श्री. रविंद्र गायकवाड, वि.स.स.
११) श्री. साहेबराव तट्टे, वि.स.स.
१२) श्री. अरुण पाटील, वि.स.स.
१३) श्री. नारायणराव गव्हाणकर, वि.स.स.
१४) श्री. सदाशिवराव पोळ, वि.प.स
१५) श्री. मधुकर सरपोतदार, वि.प.स.
१६) श्री. श्रीकांत जोशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
श्री. डी.एम.गवळी, समिती अधिकारी

**महालेखाकार (वाणिज्यिक) लेखा परिक्षा**

श्रीमती संगीता चौरे, महालेखाकार (वाणिज्यिक लेखा)
श्री. यु.बी.पाठक, वरिष्ठ लेखा परिक्षा अधिकारी (वाणिज्यिक लेखा)

**साक्षीदार**

**सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.**
श्रीमती चित्कला झुत्सी, अपर मुख्य सचिव (सेवा)
श्री. तरवेज, कक्ष अधिकारी

**गृह विभाग , मंत्रालय, मुंबई ३२.**
श्री.पी.पी. श्रीवास्तव, प्रधान सचिव (विशेष)

**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग -**
श्री. अजित पारसनीस अपर महासंचालक (अतिरिक्त कार्यभार)

**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.**
श्री. भूषण गगराणी, सचिव (सांस्कृतिक कार्य)

**महाराष्ट्र च्रित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ**
श्री. भूषण गगराणी, व्यवस्थापकीय संचालक, (अतिरिक्त कार्यभार)

समितीने भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००३-२००४ व २००४-०५ च्या (वाणिज्यिक) अहवालातील महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या परिच्छेदासंबंधात विभागीय सचिवांची तथा महामंडळाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली.

## बुधवार, दिनांक ६ जून, २००७ विधानभवन, मुंबई.

## उपस्थिती.

१) श्री. नाना पटोले, वि.स.स. तथा समिती प्रमुख.

**सदस्य**

२) श्री. संजय चव्हाण, वि.स.स.
३) श्री.रमेशभाई कदम, वि.स.स.
४) श्री. पी.यु.मेहता, वि.स.स.
५) श्री. प्रतापराव चिखलीकर, वि.स.स.
६) श्री. मदन पाटील, वि.स.स.
७) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.
८) श्री. दिनकर माने, वि.स.स.
९) श्री. रविंद्र गायकवाड, वि.स.स.
१०) श्री. साहेबराव तट्टे, वि.स.स.
११) श्री. नारायणराव गव्हाणकर, वि.स.स.
१२) श्री.सुरेशदादा देशमुख, वि.प.स.
१३) श्री.विश्वनाथ डायगव्हाणे, वि.प.स.
१४) श्री. सदाशिवराव पोळ, वि.प.स
१५) श्री. मधुकर सरपोतदार, वि.प.स.
१६) श्री. श्रीकांत जोशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री. डी.एम.गवळी, समिती अधिकारी

**महालेखाकार (वाणिज्यिक) लेखा परिक्षा**

श्रीमती संगीता चौरे, महालेखाकार (वाणिज्यिक लेखा)
श्री. यु.बी.पाठक, वरिष्ठ लेखा परिक्षा अधिकारी (वाणिज्यिक लेखा)

**साक्षीदार**

**सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.**

श्रीमती चित्कला झुत्सी, अपर मुख्य सचिव (सेवा)

**वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.**

श्री.सुनिल सोनी, प्रधान सचिव (सुधारणा)

**गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.**

श्री.पी.पी. श्रीवास्तव, प्रधान सचिव (विशेष)

**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग -**

श्री. अजित पारसनीस, अपर महासंचालक (अतिरिक्त कार्यभार)

**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.**

श्री. भूषण गगराणी, सचिव (सांस्कृतिक कार्य)

**महाराष्ट्र च्रित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ**

श्री. भूषण गगराणी, व्यवस्थापकीय संचालक, (अतिरिक्त कार्यभार)

समितीने भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००३-२००४ व २००४-०५ च्या (वाणिज्यिक) अहवालातील महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या परिच्छेदासंबंधात विभागीय सचिवांची तथा महामंडळाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली.

## मंगळवार, दिनांक १९ जून, २००७ विधानभवन, मुंबई.

## उपस्थिती.

१) श्री. नाना पटोले, वि.स.स. तथा समिती प्रमुख.

**सदस्य**

२) श्री. चंद्रशेखर भोसले, वि.स.स.
३) श्री. पी.यु.मेहता, वि.स.स.
४) श्री. दिनकर माने, वि.स.स.
५) श्री. नामदेवराव पवार, वि.स.स.
६) श्री. रविंद्र गायकवाड, वि.स.स.
७) श्री. मदन येरावार, वि.स.स.
८) श्री.सुरेशदादा देशमुख, वि.प.स.
९) श्री.विश्वनाथ डायगव्हाणे, वि.प.स.
१०) श्री. सदाशिवराव पोळ, वि.प.स
११) श्री. मधुकर सरपोतदार, वि.प.स.

**<u>महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय</u>**

श्री. उमेश खडकीकर, अतिरिक्त सचिव
श्री. व्ही. एस.जोशी, उपसचिव
श्री. विलास आठवले, अवर सचिव

**<u>महालेखाकार (वाणिज्यिक) लेखा परिक्षा</u>**

श्रीमती संगीता चौरे, महालेखाकार (वाणिज्यिक लेखा)
श्री. यु.बी.पाठक, वरिष्ठ लेखा परिक्षा अधिकारी (वाणिज्यिक लेखा)

**साक्षीदार**

**सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.**
श्रीमती चित्कला झुत्सी, अपर मुख्य सचिव (सेवा)

**वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.**
श्री.विद्याधर कानडे, प्रधान सचिव

**गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.**
श्री.के. सुब्रमणियम्, प्रधान सचिव (विशेष)

**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग -**
श्री. अजित पारसनीस, अपर महासंचालक

समितीने भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००३-२००४ व २००४-०५ च्या (वाणिज्यिक) अहवालातील महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या परिच्छेदासंबंधात विभागीय सचिवांची तथा महामंडळाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली.

**सोमवार, दिनांक ३० जुलै, २००७ विधानभवन, मुंबई.**

**उपस्थिती.**

**समिती प्रमुख**

१) श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स.

**सदस्य**

२) श्री. शशिकांत शिंदे, वि.स.स.
३) श्री. रमेशभाई कदम, वि.स.स.
४) श्री. राजेंद्र दर्डा, वि.स.स.
५) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.
६) श्री. मदन येरावार, वि.स.स.
७) श्री. नारायणराव गव्हाणकर, वि.स.स.
८) श्री. सदाशिव पोळ, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

१) श्री. उमेश खडकीकर, अतिरिक्त सचिव
२) श्री. डी. एम. गवळी, समिती अधिकारी

समितीने प्रारुप अहवालाच्या मसुद्यांवर विचार करुन तो काही सुधारणांसह संमत केला.